मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२० ■ मंगळवार, २१ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# इराणकडून अमेरिकन युद्धनौकांवर ड्रोन हल्ले


## जहाजाची जप्ती म्हणजे 'समुद्री लुटमार' असल्याची टीका

**होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये मोठा संघर्ष पेटला**

**तेहरान :** ओमानचे आखात आणि अरबी समुद्रात इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव आता थेट संघर्षात रूपांतरित झालाय. अमेरिकेने इराणची 'M/V Touska' ही मालवाहू नौका बळजबरीने जप्त केली; याला प्रत्युत्तर म्हणून इराणने अमेरिकन युद्धनौकांवर ड्रोन हल्ले चढवलेत. इराणने अमेरिकेच्या या कृतीचा 'समुद्री लुटमार' (Maritime Piracy) असे संबोधत तीव्र शब्दांत निषेध केलाय.

**समुद्रात नाट्यमय घडामोडींचा थरार :** अमेरिकेच्या मध्यवर्ती कमांडने (CENTCOM) या वृत्ताला दुजोरा दिलाय की, त्यांनी इराणचा ध्वज असलेल्या 'Touska' या जहाजाचा ताबा घेतलाय. अमेरिकेच्या 'USS Spruance' (DDG-111) या मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशक युद्धनौकेने (Guided-missile destroyer) अरबी समुद्रात या जहाजाला अडवले. सहा तास ताकीद देऊनही जहाज थांबले नाही, तेव्हा अमेरिकन नौदलाने त्याची दिशादर्शन यंत्रणा (Navigation systems) निकामी केली. त्यानंतर अमेरिकन मरिन कमांडो हेलिकॉप्टरच्या साहाय्याने जहाजाच्या डेकवर उतरले आणि त्यांनी जहाजावरील संपूर्ण कर्मचारी वर्ग आणि जहाज आपल्या ताब्यात घेतले.

**इराणचा प्रतिहल्ला :** इराणच्या 'Tasnim' या



वृत्तसंस्थेनुसार, जहाज जप्त केल्यानंतर अवघ्या काही तासांतच इराणच्या लष्कराने अमेरिकन नौदलाच्या जहाजांना लक्ष्य करून ड्रोन हल्ले चढवले. इराणच्या 'Khatam al-Anbiya' मुख्यालयाने म्हटले आहे की, अमेरिकेची ही कृती म्हणजे 'आक्रमक कृत्य' (Act of aggression) आहे. त्यांनी असा इशारा दिला आहे की, 'सशस्त्र लुटमारी'च्या या कृत्याला इराणचे सशस्त्र दल लवकरच अधिक कठोर प्रत्युत्तर देईल. अमेरिकेने सध्या लागू असलेल्या युद्धबंदीच्या अटींचे उल्लंघन केल्याचा आरोपही इराणने केलाय.

**'त्यांनी आमच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले' :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'Truth Social' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या मोहिमेच्या वृत्ताला दुजोरा दिला. ट्रम्प म्हणाले, "जहाजावरील इराणी कर्मचाऱ्यांनी आमच्या इशाऱ्यांकडे लक्ष देण्यास नकार दिला, त्यामुळे आमच्या नौदलाने त्यांना वाटेतच अडवले. ते जहाज आता पूर्णपणे आमच्या ताब्यात आहे." अमेरिकेचा असा दावा आहे की, हे जहाज नौदलाची नाकेबंदी (Naval blockade) भेदून इराणच्या 'बंदर अब्बास' या बंदराच्या दिशेने प्रवास करत होते.

**युद्धबंदी संपुष्टात येणार का? :** अलीकडे झालेले ड्रोन हल्ले आणि जहाजाची जप्ती या घटनांमुळे या प्रदेशात शांतता प्रस्थापित होण्याच्या आधीच क्षीण झालेल्या आशा-अपेक्षांना मोठा धक्का बसलाय. दोन्ही राष्ट्रांचे नौदल सध्या 'हॉर्मुझच्या सामुद्रधुनी'जवळ (Strait of Hormuz) आमनेसामने उभे आहेत. वॉशिंग्टन या परिस्थितीचे वर्णन 'नाकेबंदीची अंमलबजावणी' असे करत असले तरी तेहरान मात्र याकडे 'थेट आक्रमक कृत्य' म्हणून पाहत आहे. या दोन्ही देशांमधील शांतता चर्चेची दुसरी फेरी आज नियोजित आहे. आता हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल की, यावेळी एखादा तोडगा निघतो, की पहिल्या फेरीप्रमाणेच ही चर्चाही कोणत्याही निष्कर्षाविना संपुष्टात येते.

# मंत्री माधुरीताई मिसाळ यांना सय्यद अकबर यांच्याकडून वाढदिवसाच्या शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार तथा नगरविकास राज्यमंत्री नामदार श्रीमती माधुरीताई मिसाळ यांना उत्तम आरोग्य व उदंड आयुष्य लाभावे, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करत ज्येष्ठ पत्रकार सय्यद अकबर यांनी त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.सय्यद अकबर हे कोकण डायरी (मराठी वृत्तपत्र) चे संपादक असून ते क्रियाशील प्रेस क्लबचे रायगड जिल्हाध्यक्ष तसेच भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात माधुरीताई मिसाळ यांच्या सामाजिक, राजकीय व विकासात्मक कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.



# श्री क्षेत्र भंडारा डोंगरावर हरिनामाचा गजर; ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे यांचे विशेष कीर्तन

**दैनिक युवक आधार**

**आष्टी(प्रतिनिधी) –बाळासाहेब रकटाटे :** जगद्गुरु तुकाराम महाराज संतसंग मंडळ, कुंभेफळ बाळेवाडी पंचक्रोशी यांच्या वतीने श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे अखंड हरिनाम सप्ताह व पंचवेद गाथा पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह ३० एप्रिलपासून सुरू होऊन ७ मे २०२६ पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांनी रंगणार आहे.

या सप्ताहात विशेष आकर्षण म्हणून सोमवार दिनांक ४ मे २०२६ रोजी सायंकाळी ह.भ.प. भागवताचार्य आदिनाथ महाराज दानवे (ज्ञानाई-तुकाई गुरुकुल, आष्टी) यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले असून, भाविकांसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे.

या सोहळ्याचे व्यासपीठ संचालन ह.भ.प. गाडे महाराज (कुंभेफळ), ह.भ.प. विठ्ठल महाराज वाळके, ह.भ.प. नारायण महाराज गिरी, ह.भ.प. निर्मलाताई गोरणे (श्रीरामपूर) व ह.भ.प. चंदन महाराज पारखे (राहुरी) यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा, सकाळी गाथा पारायण, दुपारी भजन आणि सायंकाळी प्रवचन व हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध मान्यवर कीर्तनकार व प्रवचनकारांचे मार्गदर्शन लाभणार असल्याने परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.



या कार्यक्रमात ह.भ.प. नारायण महाराज गिरी, ह.भ.प. निर्मलाताई गोरणे, ह.भ.प. सोमिनाथ महाराज आमृत, ह.भ.प. चंदन महाराज पारखे, ह.भ.प. स्वामी रामानंद महाराज, ह.भ.प. रामदास दादा रकटाटे आदींची उपस्थिती लाभणार आहे.सप्ताहाच्या समारोपदिनी दि. ७ मे रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. वैराग्यमूर्ती राऊत दादा यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाची व्यवस्था हरिश्चंद्र (बबन) मल्हारी गाडे (कुंभेफळ) यांच्या वतीने करण्यात आली आहे.या सप्ताहानिमित्त पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ह.भ.प. गाडे महाराज (कुंभेफळ) यांनी केले आहे.

# कांदिवली येथे राज्य स्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.समृद्धी पर्यटन सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्ट व्दारा राज्य स्तरीय विकास रत्न प्रेरणा पुरस्कार २०२६ विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह संपन्न झाला. अक्षय तृतीया रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११वाजलेपासून दुपारी ३ वाजेपर्यंत कांदिवली पूर्व येथील अशोक सावंत सभागृहात सदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात जल्लोषात साजरा करण्यात आला.सुरुवातीला प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.व्यासपिठावरील मान्यवरांचा परिचय करून सत्कार करण्यात आले, या वेळी ट्रस्टच्या मिनाक्षी पाखरे यांनी सांगितले की," सुरुवातीला संस्था काढली तेव्हा आम्हाला त्रास झाला पण आम्ही मोठ्या चे स्वागत करुन गरिबांना मदत केली,जीवनाचे सार्थक व्हावे म्हणून गरिबांची सेवा केली, पुरस्कार हे कोणत्याही किंमतीत मोजता येत नाहीत, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबिर, आदिवासी पाड्यात सामाजिक कार्य, गोरं गरिबांना मदत, महिलांसाठी कार्य या वर संस्था ना नफा ना तोटा या तत्वावर कार्य करीत असते."उद्घाटक अलका नाईक यांनी पुढे



येण्यासाठी पुरस्कार प्रेरणा देतात सांगून जिजाऊ माता व इतर कविता सादर केल्या.रामकृष्ण कोळवणकर, अशोक मोहिते, रावसाहेब घोडेराव यांनी मार्गदर्शन केले,तर पोलीस निरीक्षक मंगेश नाईक यांनी २६/११ हल्ल्यातील चित्तथरारक अनुभव सांगितला, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांत, गणेश आरती, लावण्या, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, साईबाबा, आणि चित्रपट गाणी, आदी मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले,शब्दा शब्दावर सामर्थ्य गाजवत संदीप रासकर यांनी उत्कृष्ट, दर्जेदार सूत्रसंचालन केले. स्नेहभोजनानंतर पुरस्कार वितरण सोहळा पार पडला, मुंबई कांदिवली पश्चिम येथील पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांना मान्यवरांच्या हस्ते साहित्य रत्न पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. सुनिता क्षीरसागर, आम्ही मुंबईकर चे संपादक प्रमोद सूर्यवंशी, अनिता जाधव,व इतर विविध क्षेत्रातील मान्यवरांना विकास रत्न प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.एकंदरीत कार्यक्रम मोठ्या उत्साहात जल्लोषात पार पडला.

# पायपीटीतून उभं राहिलेलं स्वप्न; चिवडा विकणाऱ्या बापाचा मुलगा 'एमडी'च्या वाटेवर

**१५ किमीचा रोजचा प्रवास, १० किलो चिवड्याची विक्री आणि शिक्षणासाठी अखंड झगडा; डोंगरशेळकीतील मरेवाड कुटुंबाची जिद्दीची गाथा**

**दैनिक युवक आधार**

**उदगीर / प्रतिनिधी बालाजी तेलंग :** काही स्वप्नं पैशावर नव्हे, तर कष्टांच्या भांडवलावर उभी राहतात. डोंगरशेळकीतील ज्ञानोबा नागोराव मरेवाड यांनी आयुष्यभर पायपीट करून चिवडा विकला, पण मुलाच्या शिक्षणावर कधी तडजोड केली नाही. आज त्याच कष्टाचं फळ म्हणून त्यांचा मुलगा डॉक्टर होऊन एमडीच्या उंबरठ्यावर उभा आहे.

डोंगरशेळकी ते उदगीर... रोजचा १५ किलोमीटरचा प्रवास. हातात चिवड्याची टोपली आणि मनात एकच ध्यास "माझा मुलगा शिकला पाहिजे." ज्ञानोबा मरेवाड यांचा दिवस असाच सुरू होतो आणि संपतो. उन्हाचा तडाखा असो की पावसाची सर, त्यांनी कधीच पाय थांबवले नाहीत.

दररोज सुमारे १० किलो चिवडा विकून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांनी संसारही चालवला आणि मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही





पेलली. दीड एकर कोरडवाहू शेती, दोन मुली आणि एक मुलगा... परिस्थिती नेहमीच आव्हानात्मक होती. पण जिद्द मात्र अढळ होती.स्वतःच्या आयुष्यात शिक्षण अपूर्ण राहिलं, ही सल त्यांना कायम बोचत राहिली. दहावी नंतर डी.एड. ला प्रवेश मिळूनही फीअभावी ते शिक्षण पूर्ण करू शकले नाहीत. पण त्याच अपूर्णतेला त्यांनी शक्तीत बदललं. मुलगा पुंडलीक याच्या शिक्षणासाठी त्यांनी कधीच 'नाही' म्हटलं नाही.

उदयगिरी महाविद्यालयातून शिक्षण घेत पुढे पुंडलीकने वैद्यकीय क्षेत्र गाठलं. मुंबईतील जे.जे. रुग्णालयातून एमबीबीएस पूर्ण केल्यानंतर आता तो औरंगाबाद येथे एमडीचे शिक्षण घेत आहे. बापाच्या कष्टाचं सोनं करत त्याने स्वतःचं आणि कुटुंबाचं नशीब उजळवलं आहे.

**असा बनतोय चिवडा**

ज्ञानोबा मरेवाड यांचा चिवडा हा केवळ व्यवसाय नाही, तर त्यांची ओळख आहे. करडी तेलात तयार होणारा चिवडा, त्यात खोबरे, शेंगदाणे, काजू आणि खास मसाल्याचा सुगंध... या चवीत त्यांच्या कष्टांची गोडी मिसळलेली आहे. १९८५ पासून पेढ्यांचा व्यवसाय आणि २००३ पासून चिवड्याची वाट त्यांनी धरली. आज ज्ञानोबा मरेवाड यांची पायपीट थांबलेली नाही... पण त्या पावलांना आता थकवा नाही, तर समाधान आहे. कारण त्यांनी सिद्ध केलंय गरिबी अडथळा ठरू शकते, पण जिद्द असेल तर ती कधीच अडवू शकत नाही.

# शिक्षण क्षेत्र वाचवण्याची जबाबदारी शिक्षकांचीच - गजानन ऊल्हे

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** : शनिवार दि.18 एप्रिल रोजी दिग्रस येथील राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहामध्ये प्रोटान शिक्षक संघटनेचे तालुकास्तरीय शिक्षक संमेलन पार पडले. राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (ट्रेड युनियन) प्रणित प्रोटान (प्रोफेसर टीचर्स अँड नॉन एम्प्लॉईज विंग) या शिक्षक संघटनेच्या वतीने हे संमेलन आयोजित केले होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी गजानन उल्हे पाटील ,विभागीय अध्यक्ष प्रोटान शिक्षक संघटना अमरावती विभाग यांची उपस्थिती लाभली होती.

अध्यक्षीय भाषणातून गजानन उल्हे यांनी जुनी पेन्शन योजना, नवीन शैक्षणिक धोरण, आर. टी. ई. ॲक्ट, अंशतः अनुदान, शिक्षकांना दिली जाणारी प्रचंड स्वरूपाची असैक्षणिक कामे इत्यादी विषयावर शिक्षकांमध्ये त्यांनी जागृती घडवून आणली. शिक्षकावरील अन्याय दूर




करून,महाराष्ट्रातील हे शिक्षण क्षेत्र वाचवायचे असेल तर, शिक्षकांनी इतरांच्या भरवशावर न राहता राष्ट्रव्यापी ट्रेड युनियन मध्ये आपली संघटित शक्ती निर्माण केली पाहिजे! असे परखड मत त्यांनी मांडले.

उद्घाटक म्हणून मा.प्रा.डॉ मनोज भगत सर शिक्षण मंच युनिट प्रमुख हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप चोपडे विभागीय प्रभारी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ यांनी केलं तर प्रमुख वक्ते महेंद्र मेश्राम जिल्हा प्रभारी प्रोटॉन यांनी शिक्षकांच्या ज्वलंत समस्यांवर शिक्षकांना उदबोधित केले. दिनबाई विद्यालयाचे प्राचार्य शशी किरण कुंडकर, राष्ट्रीय विद्यालयाच्या प्राचार्या मंगला मेश्राम, बुटले हायस्कूलच्या प्राचार्या कुसुम मुनेश्वर, मोहनाबाई कन्या शाळेच्या प्राचार्या अनिता नगराळे, नूटा संघटनेच्या अध्यक्षा डॉ.प्रेमलता सोनपरोते हे सर्व प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर अशोक तायडे विभागीय सदस्य शिक्षक संघ, प्रवीण शिरसागर अध्यक्ष शिक्षक आघाडी, दत्तात्रय मनवर शिक्षक सेना, चंद्रशेखर नवरे प्राथमिक शिक्षक समन्वय समिती, विजय चांदेकर अध्यक्ष बिरसा ब्रिगेड एम्पलोयी सेल विदर्भ, मोहम्मद आतिक शेख प्रदेशाध्यक्ष AIITA, मोहम्मद तारीक रफिक अध्यक्ष जुनी पेन्शन योजना, मोहम्मद परसुवाले अध्यक्ष अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ, प्रा. पी.एम दिवे तालुका अध्यक्ष शिक्षक भारती, गजानन गोटे जिल्हा कार्याध्यक्ष शिक्षक संघ, संजीव गुडपल्लीवार अध्यक्ष कलाध्यापक संघटना, दिलीप सप्रे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ सुभाष जगताप प्रहार आश्रम शाळा कर्मचारी संघटना गजानन खरबडे का स्ट्राइक शिक्षक संघटना एकनाथ मोगले कास्ट्राईब शिक्षक संघटना रमेश पवार जिल्हाध्यक्ष शिक्षकेतर कर्मचारी संघटना इत्यादींची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे संचलन प्रोटान तालुकाध्यक्ष दिग्रस जयपाल सोनोने यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रोटान उज्वलदीप धुर्वे यांनी केले..सदर कार्यक्रमासाठी शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली. विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सुद्धा मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या रोप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने २६एप्रिल २०२६ रोजी धारावीत महाअधिवेशन!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई :(दत्ता खंदारे )** : समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या रोप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने समाजातील सर्व घटकांना एकत्रित आणण्यासाठी आणि सरकारकडे कक्कय्या समाजाच्या मागण्या मांडून त्या सोडविण्यासाठी रविवार दिनांक २६एप्रिल २०२६ रोजी धारावीत एकदिवशीय महाअधिवेशन घेण्यात येणार आहे.सदर महाअधिवेशन मनोहर जोशी विद्यालय, प्रांगण, धारावी डेपो,पी एम जी पी संकुल जवळ, धारावी - मुंबई ४०० ०१७ येथे सकाळी ९ते ६ या वेळेत होणार आहे.




सदर महाअधिवेशनासाठी श्री.सुशीलकुमार शिंदे(माजी गृहमंत्री,भारत सरकार) कु.प्रणिती शिंदे (खासदार सोलापुर),श्री. रामदास आठवले(मंत्री सामाजिक न्याय विभाग भारत सरकार ),श्री.संजय शिरसाट(मंत्री सामाजिक न्याय विभाग,) श्री. मंगलप्रभात लोढा(मंत्री कौशल्य विकास),श्री.आशिष शेलार(माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री )वर्षाताई गायकवाड (खासदार ),श्री. अनिल देसाई (खासदार ),श्री.राहुल शेवाळे (माजी खासदार ),श्री.अमित साटम (आमदार),सौ. कल्पना नरहिरे(माजी खासदार ),ज्योती गायकवाड(आमदार )श्री. ज्ञानराज चौगुले (माजी आमदार ),श्री. सुभाष साबणे (माजी आमदार )श्री.बाबुराव माने (माजी आमदार ),श्री. धर्माजी सोनकवडे(माजी आमदार)तसेच समाजातील अनेक नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

असे समस्त कक्कय्या समाज महासंघाचे अध्यक्ष श्री. निवृत्ती सावळकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# कर्तव्य, प्रामाणिकता आणि मानवतेचा संगम; गजानन कनाके यांच्या पदोन्नतीनिमित्त भव्य सन्मान सोहळा

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : कर्तव्यदक्ष, संवेदनशील आणि सामाजिक बांधिलकी जपणारे पोलिस अधिकारी श्री गजाननराव कनाके यांच्या पदोन्नतीनिमित्त त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. “ग्राम स्वराज्य महामंच”च्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.




भारतीय समाजव्यवस्थेत सामाजिक क्षेत्रात अथवा शासकीय सेवेत कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे ही एक समृद्ध परंपरा आहे. हाच मानवतावादी दृष्टिकोन जपत “ग्राम स्वराज्य महामंच”ने अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर हा सन्मान सोहळा आयोजित केला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. मधुसूदन कोवे गुरुजी (अध्यक्ष, ग्राम स्वराज्य महामंच) यांनी भूषविले. तसेच विदर्भ राज्य आंदोलन समिती, यवतमाळचे जिल्हाध्यक्ष मा. कृष्णाजी भोंगाडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा. डॉ. विलास कनाके यांच्या पुढाकारातून हा सोहळा पार पडला. यावेळी श्री गजाननराव कनाके यांना शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री कनाके हे पोलिस प्रशासनात कार्यरत असताना केवळ आपले कर्तव्य बजावत नाहीत, तर सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही ते सक्रिय सहभाग नोंदवतात. विशेषतः दीनदलित, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले असून त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे उपस्थितांनी कौतुक केले.

नुकतेच त्यांची यवतमाळ जिल्ह्यातील बिटरगाव पोलीस ठाण्यात पदोन्नती झाल्याने त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. “कर्तव्यदक्ष व्यक्तींचा सन्मान होणे गरजेचे आहे,” असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले.

कार्यक्रमात मा. डॉ. विलास कनाके व अध्यक्ष मा. मधुसूदन कोवे गुरुजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर श्री गजाननराव कनाके यांनी एका चित्रपटातील गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन मा. मधुसूदन कोवे गुरुजी यांनी केले, तर आभार प्रदर्शन मा. पवार साहेब यांनी मानले.हा सन्मान सोहळा केवळ एका अधिकाऱ्याच्या पदोन्नतीपुरता मर्यादित न राहता, समाजातील कर्तव्यनिष्ठ आणि मानवतावादी वृत्तीला प्रेरणा देणारा ठरला.

# पाणी परिषदेला माजी नगरसेवक शिवदास कांबळे यांचा पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : पनवेल शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आयोजितपाणी परिषद घेण्याच्या धोरणाला माजी नगरसेवक शिवदास कांबळे यांनी पाठिंबा दिला असून यासंबंधीचे पत्र त्यांनी महापौर नितीन पाटील यांना सुपूर्द केले.



यानिवेदनात त्यांनी म्हटले आहे कि, पनवेल शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आपण उचललेली पावले अभिनंदन आणि स्तुत्य आहेत ज्याद्वारे पनवेल मधील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी मदत व्हावी म्हणून तातडीने पनवेलचे कर्तव्यदक्ष आमदार प्रशांत ठाकूर साहेब यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकाची न्हावा शेवा पाणीपुरवठा योजना (टप्पा क्रमांक ३) चा पाठपुरावा करून मार्गी लावण्यासाठी आढावा बैठक घेतली. त्यानुसार त्यामध्ये असलेला शासकीय त्याचबरोबर जमीन अधिग्रहण किंवा नागरिकांकडून होत असलेल्या अडथळयांबाबत त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी व सोडवण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर +यांच्या सूचनेप्रमाणे आपल्या सहकारी नगरसेवकांवरती जबाबदारी सोपवणे म्हणजे सामान्यांनी आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ करणारी घटना आहे त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार. त्याचबरोबर या विषयावरती आपण पाणी परिषद घेणार आहात हे ऐकून मनस्वी आनंद झाला की या आणि परिषदेद्वारे सर्वसामान्य जनतेला सामावुन घेऊन त्याची व्याप्ती वाढवावी व त्याद्वारे पाण्याचे महत्व पाण्याचा गैरवापर पाण्याचा योग्य वापर पाण्याचे पुनर्निर्माण बाबींमध्ये नागरिकांना दक्ष ठेवून आदर्श पनवेलच्या कल्पनेमध्ये अभिप्रेत पाणीपुरवठा निरंतर सुरळीत पनवेलकरांसाठी उपलब्ध होईल असे त्यांनी म्हटले.

# रेल्वे स्टेशन परिसरात पोलीस चौकी करा व पे अँड पार्क' पार्किंग व्यवस्था सुरू करा - नगरसेविका ऍड शिवानी घरत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : नवीन पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील परिसरात पोलीस चौकी उभारणे व महापालिकेच्या माध्यमातून पे अँड पार्क' पार्किंग व्यवस्था सुरू करावी अशी मागणी नगरसेविका ऍड शिवानी घरत यांनी पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे.



नवीन पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ असते विशेषतः रात्रीच्या वेळी महिलां सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरेशी त्यामुळे त्या ठिकाणी पोतीस चौकी उभारणे अलीत आवश्यक आहे, जेणेकरून कापदा व सुव्यवस्था राखती जाईल आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल तसेच सदर परिसरात पार्किंगची मोठी समस्या निर्माण झाली असून अनेक वाहनधारकांकढून अनधिकृत मार्किंग केले जाते. स्टेशनच्या जवळच असलेल्या रिकाम्या जागेचा पोग्य वापर करून पनजेत महानगरपालिकेमार्फत तेथे पे बैंड पार्क पद्धतीने नियोजित पार्किंग सुविधा उभारण्यात यावी अशी विनंती आहे गामुळे वाहतूक कोडी कमी होईल तसेच शिस्तबद्ध पार्किंगची व्यवस्था निर्माण होईल. वरीत दोन्ही प्रसाव राबविल्यास नवीन पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील परिसरातील सुरक्षितता वाहतूक व्यवस्यापनात तक्षनीय सुधारणा होईल, असा विश्वास आहे. आपण या मागण्यांची तातडीने दखत पेऊन योग्य ही कार्यवाही करावी अशी विनंतीचे निवेदन ऍड शिवानी घरत यांनी दिले आहे.

# पालोद येथे २४ एप्रिलपासून टेनिस बॉल क्रिकेटचा थरार; विजेत्यांना मिळणार आकर्षक रोख पारितोषिके

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर/योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्यशिल उत्सव समिती, पालोद (ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्या वतीने येथील यशवंत विद्यालय मैदानावर भव्य 'खुली टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. येत्या २४ एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत ग्रामीण भागातील खेळाडूंना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे.



स्पर्धेच्या नियोजनाबाबत माहिती देताना आयोजकांनी सांगितले की, ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या विजेत्या संघाला ३१,००० रुपये, द्वितीय क्रमांकाच्या संघाला २१,००० रुपये आणि तृतीय क्रमांकाच्या संघाला ११,००० रुपयांचे आकर्षक रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेतील सर्व सामने 'लीग' पद्धतीने खेळवले जाणार असल्याने खेळाडूंना आपल्या संघाचे कौशल्य पणाला लावण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संघनिहाय २,००० रुपये प्रवेश शुल्क निश्चित करण्यात आले आहे. इच्छुक संघांनी १ मे २०२६ पर्यंत आपली नावनोंदणी पूर्ण करणे अनिवार्य आहे. स्पर्धेचे सामने दररोज सकाळी ८ वाजता सुरू होतील. स्पर्धा शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी आयोजन समितीने नियमावली जाहीर केली असून, पंचांचा निर्णय सर्व संघांवर अंतिम व बंधनकारक राहील. स्पर्धेच्या वेळापत्रकात बदल करण्याचा कोणताही अधिकार आयोजन समितीकडे राखीव आहे. तसेच, स्पर्धा कालावधीत खेळाडूंना होणाऱ्या कोणत्याही शारीरिक दुखापतीस किंवा अपघातास आयोजन समिती जबाबदार राहणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विनोद दांडगे, विलास दामोदर, अब्दुल अजिज, कृष्णा पालोदकर आणि संतोष दांडगे हे परिश्रम घेत आहेत. नावनोंदणी व अधिक माहितीसाठी संघप्रमुखांनी ९६६५३१२३१६, ७८७५०४५९५९, ७०३८४८४८४५ व ८३२९४९५०६८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अन्वी शिवारात उन्हाळी मिरची लागवडीची लगबग; आधुनिक नियोजनामुळे दर्जेदार उत्पन्नाची आशा

**दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : तालुक्यातील अन्वी शिवारात सध्या उन्हाळी मिरची लागवडीचा हंगाम जोमाने सुरू आहे. एप्रिलच्या कडक उन्हाळ्याचे आव्हान असतानाही, येथील प्रयोगशील शेतकरी पारंपरिक शेती पद्धतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन पिकाचे शाश्वत व्यवस्थापन करताना दिसत आहेत.



> **"मिरची लागवड हा आमच्या शेतीचा अविभाज्य भाग आहे. यंदा उन्हाळा असला तरी, ठिबक सिंचन आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे आम्ही पिकाचे काटेकोर नियोजन करत आहोत. दर्जेदार उत्पादन घेऊन योग्य वेळी विक्री करण्याचे आमचे ध्येय आहे."**
> **— रामेश्वर समिंद्रे, प्रगतशील शेतकरी,**

अन्वी शिवारात शेतकरी मिरचीच्या वाणानुसार योग्य अंतर राखून लागवड करण्यावर भर देत आहेत. योग्य अंतरामुळे पिकास पुरेसा सूर्यप्रकाश आणि खेळती हवा मिळते, ज्याचा थेट सकारात्मक परिणाम झाडांच्या जोमदार वाढीवर आणि गुणवत्तेवर होत आहे. सद्यस्थितीत 'शार्क वन', 'अधीरा', 'सिंधू', 'करिष्मा' आणि 'तेजाफोर'लालपरी यांसारख्या अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांना शेतकऱ्यांची पहिली पसंती मिळत आहे.

मल्चिंग पेपरचा वापर आणि ठिबक सिंचन प्रणालीमुळे पाण्याची मोठी बचत होत असून, तणांचे प्रभावी नियंत्रण करणे शक्य झाले आहे. याशिवाय, 'एकात्मिक कीड व्यवस्थापन' पद्धतीचा अवलंब केल्यामुळे पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होत आहे. एप्रिलमध्ये केलेली ही लागवड साधारण ६५ ते ७० दिवसांत काढणीस तयार होते. जूनच्या सुरुवातीस जेव्हा बाजारपेठेत हिरव्या मिरचीची आवक मर्यादित असते, तेव्हा हा दर्जेदार माल विक्रीसाठी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्याची शक्यता आहे.

# मानवता फाउंडेशन कडून खारघर आदिवासी पाड्यावर ‘अन्नदानम’



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** मानवता फाउंडेशन कडून "अन्नदानम " प्रोजेक्ट मार्फत खारघर आदिवासी पाड्यावर आदिवासी बांधवाना अन्नदान करण्यात आले. या वेळी मानवता फाउंडेशन चे अध्यक्ष संजय पवार , उपाध्यक्ष विनोद नायर, विकी मेगणी, टिपू पटवेगर, चेतन कदम, नंदनी सिंग, तुषार डीकुळे, आफताब आलम, विघ्नेश नारायांकर, सुरज दुबे, रोहन परदेशी, इत्यादी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# कांदा उत्पादन शेतकरी कमी बाजार भावामुळे संकटात

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी - मारुती सत्रे** : कांदा उत्पादक शेतकऱ्यांचं संकट नवीन नाही—पण सध्याची परिस्थिती खरोखरच गंभीर आहे. विशेषतः महाराष्ट्र मध्ये, जिथे देशातील मोठा कांदा उत्पादन होतो, तिथे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

संकटाची मुख्य कारणं

१. भाव कोसळणे

बाजारात कांद्याचा पुरवठा जास्त झाला की भाव अचानक खाली येतात. अनेकदा उत्पादन खर्चही निघत नाही.

२. निर्यात बंदी किंवा निर्बंध

सरकारने महागाई नियंत्रणासाठी कधी कधी निर्यात बंद केली तर आंतरराष्ट्रीय बाजार बंद होतो. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो.

३. साठवणूक समस्या

कांदा दीर्घकाळ साठवण्यासाठी योग्य गोदामांची कमतरता आहे. त्यामुळे शेतकरी लगेच विकायला भाग पडतात—भाव कमी असतानाही.

४. हवामान बदल



अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे उत्पादनाचं नुकसान होतं आणि गुणवत्ता कमी होते.

शेतकऱ्यांवर परिणाम

कर्जबाजारीपणा वाढतो

उत्पन्न अनिश्चित

मानसिक ताण आणि काही वेळा आत्महत्यांचे प्रकार

उपाय काय असू शकतात?

किमान आधारभूत किंमत (MSP) हमी

निर्यात धोरण स्थिर ठेवणे

आधुनिक साठवणूक सुविधा वाढवणे

प्रक्रिया उद्योग (onion processing) विकसित करणे

शेतकरी उत्पादक कंपन्या (FPOs) मजबूत करणे

# सिल्लोडमध्ये महात्मा बसवेश्वर व भगवान परशुराम जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर /जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड शहरात महात्मा बसवेश्वर आणि भगवान परशुराम जयंती अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या निमित्त शहरातील महात्मा बसवेश्वर चौक व भगवान परशुराम चौक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार अब्दुल सत्तार उपस्थित होते. आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते दोन्ही चौकांमध्ये महात्मा बसवेश्वर व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, "महात्मा बसवेश्वर यांच्या समतेच्या विचारांचा आणि भगवान परशुराम यांच्या पराक्रम व कर्तृत्वाचा वारसा पुढे नेण्याची आज नितांत गरज आहे. समाजात एकात्मता, न्याय आणि सद्भावना वृद्धिंगत करण्यासाठी या थोर महापुरुषांचे विचार सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी ठरतील." याप्रसंगी त्यांनी सर्व नागरिकांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा नगरसेवक नंदकिशोर सहारे, नगरपरिषदेतील गटनेते सुधाकर पाटील, किशोर अग्रवाल, राजेंद्र ठोंबरे, शंकरराव खांडवे, फईम पठाण, दीपक घरमोडे, कुणाल सहारे, कृष्णा वाघ यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समितीचे प्रशांत क्षीरसागर, काशिनाथ बेलपत्रे, मुकुंद कोठीवाले, सुभाष गवंडरे, राजू बोधेकर, संजय मिटकरी, सोम पाटील, संतोष कोठाळे, विनायक ज्ञाने, अंबादास जगनाडे, अनंत बेलपत्रे, नितीन गवंडरे, राजीव कोठीवाले, डॉ. रायगावकर, शिवराज गुळवे, मल्लिकार्जुन मिटकरी, महेश मिटकरी, नरेंद्र ज्ञाने तसेच भगवान परशुराम जयंती उत्सव समितीचे रवींद्र दानी, सतीश कुलकर्णी, प्रकाश अन्वीकर, प्रशांत जोशी, सचिन उपळीकर, अमित दाणी, सचिन चोबे, अनिल कुलकर्णी, योगेश कुलकर्णी, मंगेश खोंडे, भाऊ गोमटे, निलेश सोनटक्के, अजय इंगे, नागेश सोनटक्के, संजय देशपांडे, प्रतीक कुलकर्णी, गजानन सोनटक्के आदी मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोला विमानतळाचे"श्री संत गजानन महाराज विमानतळ" नामकरण करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या कडे मागणी !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाने अकोला विमानतळाचे भुसंपादनाकरीता २०८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याने, अकोला येथील शिवणी विमानतळाचे विस्तारीकरणाचे काम प्रगतीत असून अल्पावधीत सदरचे विमानतळ लोकसेवेत रुजू होणार आहे. आमदार रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांच्या मागणीची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकोले कर ची मागणीची पूर्तता केली. अकोला शहरानजिक शेगाव, जि. बुलढाणा येथे श्री संत गजानन महाराजांचे पावन वास्तव्य असल्याने शेगाव नगरीला विदर्भाची पंढरी असे





संबोधले जाते या ठिकाणी लाखो भाविक-भक्त व वारकरी श्री संत गजानन महाराजांच्या आशिर्वाद व दर्शनासाठी येत असतात. शेगाव येथे येण्याकरीता मध्य रेल्वेची तसेच महामार्गाची व्यवस्था आहे. परंतु देश आणि परदेशातून येणा-या श्रद्धाळू भाविकांना संत नगरी शेगाव येथे येण्याकरीता कोणतीही हवाई वाहतूक उपलब्ध नाही. त्या कारणाने अकोला शहरातील शिवणी विमानतळ विस्तारीकरणाचे काम तातडीने करण्याकरीता आमदार रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांनी शासनास विनंती केली आहे. तसेच आमदार व खासदारद्वयांनी अकोला येथील शिवणी विमानतळाचे श्री संत गजानन महाराज विमानतळ असे नामकरण करण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत तातडीने निर्णय व्हावा व सदर नामकरण करण्याकरीता केंद्र शासनाला शिफारस करण्यास विनंती केली आहे. या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे सचीव यांना निर्देश दिले. प्रस्ताव सादर करून लवकरच मंत्री मंडळाची मान्यता प्राप्त होऊन केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे

त्यामुळे विदर्भातील पंढरी व संत गजानन महाराज संत परंपरा संस्कृतीला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार सावरकर आणि खासदार धोत्रे यांच्या मागणीची पूर्तता केली आहे.

# युवा शक्ती जागर यात्रेनिमित्त कृष्णराज महाडीक यांचा उत्तर रायगड दौरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष व युथ आयकॉन कृष्णराज महाडीक मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ रोजी उत्तर रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. युवा शक्ती जागर यात्रेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांद्वारे युवकांशी संवाद साधण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. दौऱ्याची सुरुवात दुपारी ३.०० वाजता पनवेलमधील गार्डन हॉटेल येथून भव्य बाईक रॅलीद्वारे स्वागताने होणार आहे.



त्यानंतर दुपारी ३.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात येईल. दुपारी ४:०० वाजता श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळसभागृहात युवा पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात संघटनात्मक बळकटीकरण व आगामी उपक्रमांवर चर्चा होणार आहे. सायंकाळी ५. ३० वाजता वडाळे तलाव येथे KM' तरुणाई व सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स सोबत विशेष meet-up आयोजित करण्यात आला असून, डिजिटल माध्यमातून युवकांशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या सर्व कार्यक्रमांना युवक, युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे आणि पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# लाखनीत 'व्हॉइस ऑफ मीडिया'ची बैठक उत्साहात संपन्न; पत्रकारांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/लाखनी** : व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक लाखनी येथील शासकीय विश्रामगृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत पत्रकारांच्या विविध समस्या, सुविधा आणि हक्कांबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीत व्हॉइस ऑफ मीडिया भंडारा जिल्हाध्यक्ष शशिकांत भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीदरम्यान जिल्हाध्यक्ष यांच्या वतीने पत्रकारांसाठी आवश्यक असलेल्या विविध मागण्यांवर ठोस भूमिका मांडण्यात आली. यामध्ये पत्रकारांना बसपास सुविधा मिळावी, पात्र व योग्य व्यक्तींना पत्रकारितेत संधी मिळावी, अपघातग्रस्त पत्रकारांना तातडीने ५० हजारांची आर्थिक मदत द्यावी, पत्रकारांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा, त्यांच्या



पाल्यांना महाराष्ट्र राज्य सेवा आयोग परीक्षेचे मोफत ऑनलाईन व ऑफ लाईन वर्ग उपलब्ध करणे तसेच पत्रकारांसाठी स्वतंत्र आणि अत्याधुनिक पत्रकार भवन उभारण्यात यावे, अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या.

याशिवाय, पत्रकारांना त्यांच्या कार्यादरम्यान येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यांना कायदेशीर संरक्षण मिळणे अत्यावश्यक असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. या बैठकीस व्हॉइस ऑफ मीडियाचे लाखनी तालुकाध्यक्ष कल्याण राऊत, जेष्ठ पत्रकार कालिदास खोब्रागडे, देवराम फटे, उमेश सिंगनजुडे, मिथिलेश गिरेपुंजे, मुकेश मेश्राम, नरेंद्र मेश्राम, रोशन खोब्रागडे, अतुल नागदेवे, खुशाल भुरे, मदन कमाने, रवी धोत्रे, राजू खान, तुषित गजभिये, चंदन मोटघरे, शमीम ए. कबानी, भावेश धंधुकीया, अनिल शेंडे, श्यामसुंदर उके, प्रणय सहदेवकर आदींची उपस्थिती होती बैठकीत पत्रकार संघटनेची एकजूट मजबूत करण्यावर आणि त्यांच्या हक्कांसाठी संघटितपणे लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# २०२५ च्या खरीप पीक विम्या साठी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचे तीव्र निदर्शने- कॉ.महादेव नागरगोजे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : खरीप पिक विमा व शेतकरी प्रश्नांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ भारतीय कम्युनिस्ट पक्ष किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचे तीव्र निदर्शन करण्यात येणार आहेत. ही आंदोलनात्मक कारवाई बुधवार, दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार असल्याची माहिती कॉम्रेड महादेव नागरगोजे यांनी दिली. सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतजमिनी खरडून वाहून जाऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुमारे ३००० जनावरे वाहून गेली. तसेच १०० शेतकऱ्याना जीव गमवावा लागला. गेल्या आठ महिन्यांत



१२८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून मागील दिड ते दोन महिन्यांतच बीड जिल्ह्यात सुमारे १५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने जाहीर केलेली नुकसान भरपाई अत्यंत अपुरी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रति हेक्टर १८,५०० रुपये देण्याचे जाहीर करून प्रत्यक्षात केवळ ८,५०० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. तसेच २०२५ चा खरीप पिक विमा अद्याप शेतकऱ्यांना मिळालेला नाही, उलट बीड जिल्ह्याला या योजनेतून वगळण्यात आला आहे. या शिवाय २०२० चा थकीत खरीप विमा व २०२३-२४ चा राहिलेला ७५% खरीप पिक विमा अद्याप शेतकऱ्यांना दिला नसल्याने शासनाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयावर खालील मागण्या करिता शेतकऱ्यांचे तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत.

**मागण्या...**

१)- सन २०२५ चा खरीप पिक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा.

२)- २०२३-२४ चा प्रलंबित ७५% खरीप पीक विमा रक्कम त्वरित अदा करावी.

३)- सन २०२० चा थकीत खरीप पिक विमा त्वरित शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावा.

४)- शेतकऱ्यांना कोणत्याही अटी व शर्ती न लादता सरसकट कर्ज माफ करा. व नव्याने कर्ज वाटप करा. या साठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे. असे आवाहन महाराष्ट्र राज्य किसान सभेचे उपाध्यक्ष कॉ.महादेव नागरगोजे यांनी केले आहे.

# पनवेल तहसिल अंतर्गत पळस्पे मंडळातील मौजे पळस्पे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन पनवेल तहसील कार्यालय अंतर्गत पळस्पे महसूल मंडळाच्या वतीने पळस्पे येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालय, पळस्पे येथे १७ एप्रिल रोजी करण्यात आले. शासन आपल्या दारी या संकल्पनेतून नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश या शिबिरामागे होता. या कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपजिल्हाधिकारी रायगड जनार्दन कासार व तहसीलदार पनवेल मीनल भोसले भामरे यांच्यासह पळस्पे मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व महसूल कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांसाठी महाविस्तार एआय



ॲप नोंदणी व फार्मर आयडी रजिस्ट्रेशन, एसआयआर मॅपिंगद्वारे मतदारांचे नोंदणी व पडताळणी कार्य, मोठ्या प्रमाणावर आधार कार्ड अपडेट सुविधा, नागरिकांसाठी आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, आरोग्य तपासणी व वैद्यकीय सुविधा, कृषी विभाग, रेशन कार्ड व इतर शासकीय योजनांची माहिती व सेवा, एनसीएमसी कार्ड नोंदणी (बस प्रवास सवलतीसाठी), 7/12 उतारे व इतर महसुली सेवा, विविध प्रकारचे दाखले वाटप करण्यात आले. यावेळी १ हजार २०० नागरिकांना विविध योजनांचा थेट लाभ देण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. मंगेश वाकडीकर यांनी अशा शिबिरांमुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध होत असल्याने वेळ व खर्चाची बचत होत असल्याचे नमूद केले. जनार्दन कासार यांनी महसूल विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे नागरिकांना तात्काळ सेवा मिळत असल्याचे सांगितले. तहसीलदार मीनल भोसले भामरे यांनी "शासन आपल्या दारी" ही संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी महसूल विभाग कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

पळस्पे मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महाराजस्व समाधान शिबिराचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणीबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

# नाशिक कलावंत पुरस्कार अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडित यांना प्रधान केला



**दैनिक युवक आधार**

**( प्रतीनिधी लोणी )** : अभिनेता दिर्देशक प्रमोद पंडीत राहणार पाथरे बुद्रुक तालुका राहता जिल्हा अहिल्यानगर यांना दिनांक 19 एप्रिल 2026 नाशिक येथे कलावंत विचार मंच कमल फिल्म प्रोडक्शन आणी कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे कलावंत पुरस्कार वितरण सोहळा अध्यक्ष सुनील मोंढे यांच्या स्वागताध्याक्षाने संपन्न झाला.

या पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी जेष्ठ साहित्यिक सुभाषजी सोनवणे, अभिनेत्री दिपाली कुलकर्णी, प्रा.सोमनाथ मुठाळ, कवीयत्री सुनीता वाळुंज यांच्या हस्ते अभिनेते दिग्दर्शक प्रमोद पंडित यांनी कलवंत पुरस्कार नाशिक येथे देण्यात आले यावेळी महाराष्ट्राचे कलावंतन ना पुरस्कार देण्यात आले व मान्यवर उपस्थित होते

## हाताबुकक्याने आणि बांबूने मारहाण केल्या प्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : एका कारने दुसऱ्या कारला धडक दिल्याने पाच जणांनी हाताबुक्क्याने आणि बांबूने मारहाण आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 20 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 20 एप्रिल रोजी रात्री बाराच्या सुमारास कर्मवीर भाऊराव पाटील चौक, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ मारुती वॅगन आर कार क्रमांक एम एच ४६ बीयु 694 हिला मारुती एर्टिगा कार क्रमांक एम एच 46 डीए 6222 वरील चालकाने भरधाव वेगाने येऊन वाहनाचे नुकसान केले. या कारणावरून सोमनाथ तुकाराम इचके, दीपक मोरे, स्वप्नील भांगे, अमोल तुकाराम कवधरे, शिवाजी आहेरकर यांनी फिर्यादी दादा हयात गौसमूद्दीन मनियार (राहणार अजिवली) याला पाठीवर, हातावर, डोक्यात मारहाण करून दुखापत केली तसेच त्याला वाचवण्यासाठी आलेले मोहसीन मिस्त्री, उजल्फा अन्सारी, रसूल शेख, सदाम खान यांना देखील बांबू आणि हाताबूक्याने मारहाण करून शिवीगाळ केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## लोखंडी पट्टीवरून दुचाकी घसरल्याने दोन वर्षीय मुलगी जखमी



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरील लोखंडी पट्टीवरून दुचाकी घसरल्याने झालेल्या अपघातात दोन वर्षीय मुलगी जखमी झाली. येथील लोखंडी पट्टी क्रॉस करताना अनेक दुचाकी घसरतात. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे. जैन कुटुंबीय दुचाकीवरून पनवेलच्या दिशेने येत होते. 19 एप्रिल रोजी रात्री आठच्या सुमारास ते जेवणासाठी पनवेल येथे येत असताना नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरील लोखंडी क्रॉसिंग पट्टीवरून त्यांची दुचाकी स्लिप झाली आणि ते सर्वजण खाली पडले. यात त्यांच्या दोन वर्षीय मुलीला गंभीर दुखापत झाली. तातडीने मुलीला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तीच्यावर उपचार करून तिला सोडण्यात आले. मात्र या ठिकाणी लोखंडी पट्टी क्रॉस करताना अनेकदा अपघात झालेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

## डासाळा सहकारी संस्थेत राम (नाना) पाटील यांचा बहुमताने ठराव मंजूर



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी)शिवाजी पवार** : डासाळा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सन 2026–2031 कालावधीसाठी सभासदांच्या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीत राम (नाना) पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला.

उद्धव गजमल यांनी राम पाटील यांचे नाव सुचविले, तर चेअरमन रणजीत गजमल यांनी त्यास अनुमोदन दिले. तर भारतीय जनता पक्षाकडून पांडुरंग मनोहर गजमल यांच्या नावाचा प्रस्ताव शिवाजी गजमल यांनी मांडला.

मतदानात राम पाटील यांना 10 मते मिळाली, तर पांडुरंग गजमल यांना 3 मते मिळाली. त्यामुळे राम पाटील यांचा प्रस्ताव बहुमताने पारित झाला. यावेळी सर्व संचालकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल राम पाटील यांनी आभार व्यक्त केले.

# केज येथे चाईल्ड प्रायमरी स्कूलचा “स्वराज्य बालमहोत्सव – 2026” उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**केज (प्रतिनिधी)** :येथील चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या वतीने आयोजित *“स्वराज्य बालमहोत्सव – 2026”* हा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक, पत्रकार तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी मा. श्री. सुनीलजी केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले, तर अध्यक्षस्थानी केंद्र प्रमुख मा. श्री. संजयजी चौरे होते. या प्रसंगी अंबा सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाईचे चेअरमन मा. श्री. रमेशरावजी आडसकर साहेब विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.




तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. भाई मोहन गुंड, मा. श्री. डॉ. हनुमंतजी सौदागर, मा. श्री. हनुमंतजी भोसले, मा. श्री. डॉ. नागेशजी कराळे, मा. श्री. ॲड. अविनाशजी धायगुडे, मा. श्री. शिवाजी (दादा) ठोंबरे, मा. श्री. कृष्णाजी थोरात, मा. श्री. गोविंदजी ससाणे, मा. श्री. उपेंद्रजी शिंदे, मा. श्री. ज्ञानेश्वर बिराजदार, मा. श्री. एच. पी. देशमुख, मा. श्री. शरीफजी सय्यद, मा. श्री. चंद्रकांतजी पाटील, मा. श्री. दत्ताजी मुजमुले, मा. श्री. अनिलजी गलांडे, मा. श्री. विष्णु (आबा) तपसे, मा. श्री. मदन (बप्पा) तपसे, मा. श्री. अजयजी चाटे, मा. श्री. साईनाथजी गावडे, मा. श्री. अलीमजी सय्यद, मा. श्री. अक्षयजी येवले आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका, शेतकरी गीत तसेच देशभक्तीपर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. लहानग्या विद्यार्थ्यांच्या आकर्षक व रंगतदार सादरीकरणामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

अंबा सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाईचे चेअरमन मा. श्री. रमेशरावजी आडसकर साहेब यांनी मार्गदर्शन करताना, “या शाळेसाठी आवश्यक ती सर्व मदत आम्ही करू,” असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे उद्घाटक गट शिक्षणाधिकारी केंद्रे साहेब यांनी पालकांना संबोधित करताना सांगितले की, “केज तालुक्यातील उपक्रमशील शाळा म्हणून या शाळेकडे पाहिले जाते व ही गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी शाळा आहे.” इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे संचालक श्री. शरद गिराम यांनी केले. यावेळी त्यांनी, “आम्ही विद्यार्थ्यांना कृतीप्रधान शिक्षण देतो,” असे सांगितले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शिंदे मॅडम, साखरे मॅडम, तपसे मॅडम, राऊत मॅडम, पुरी मॅडम, भाऊसाहेब शिंदे, हर्षद गिराम, सचिन गिराम, अनिल चटप, बिरूदेव भंडारे, गोरख चाळक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापनाबद्दल उपस्थितांनी शाळेच्या कार्याचे कौतुक केले.

## पनवेल रेल्वे स्थानकात लिफ्ट कोसळली, 4 प्रवासी अडकले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : आज आठवड्याचा पहिला दिवस आणि ऑफिसला जाणाऱ्यांची लगबग असतानाच पनवेल रेल्वे स्थानकात मोठी दुर्घटना घडली. पनवेल रेल्वे स्थानकात प्लॅटफॉर्म नंबर ७ वर लिफ्ट कोसळली. ४ प्रवासी अडकले होते.

पहाटेची वेळ होती, लांब पल्ल्याच्या गाड्या येत जात होत्या. प्रवाशांची गर्दी स्थानकात होती. ही लिफ्ट वरुन खाली येत असताना कोसळली. चार प्रवासी अडकले होते त्यांना रेस्क्यू करून बाहेर काढण्यात आले. एकंदरीतच रेल्वे प्रवाशांसाठी



बसवण्यात आलेल्या लिफ्ट या नादुरुस्त किंवा मेंटेन केल्या जात नाहीत हे या निमित्ताने पुन्हा निदर्शनास आलं आहे. पनवेल हे वर्दळीचं ठिकाणी आहे.

तिथे लांब पल्ल्याच्या गाड्या, लोकल शिवाय मेमू ट्रेन्स देखील जात असतात. त्यामुळे या स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी असते. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी ऑफसला जाण्याची देखील गर्दी प्रवाशांची होत असतानाच ही मोठी दुर्घटना प्लॅटफॉर्म नंबर ७ वर घडली आहे. लिफ्ट कोसळल्याने प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाली आहे.

लिफ्ट कोसळल्या प्रकरणी चौकशी केली जाणार आहे. लिफ्ट कशी कोसळली यामागचं कारण अद्याप समजू शकलं नाही.

आठवड्याच्या पहिल्याच दिवशी दुर्घटना घडल्याने भीतीचं वातावरण आहे.

## २१ एप्रिलपासून शिक्षकेतर बेमुदत संपावर, शिक्षण व्यवस्था कोलमडणार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी** : राज्यातील प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाच्या उदासीन भूमिका विरोधात दि. २१ एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या “महाराष्ट्र राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती”च्या बेमुदत संप आंदोलनात महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ सहभागी होणार असल्याची माहिती महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी राज्यातील विभागीय कार्यवाहांना पाठविलेल्या पत्राद्वारे दिली आहे.या पार्श्वभूमीवर मुंबई विभागीय शिक्षकेतर कर्मचारी संघटना देखील आपल्या न्याय्य मागण्यांसाठी मोठ्या संख्येने या बेमुदत संपात सहभागी होणार असल्याचे राज्य शिक्षकेतर महामंडळाचे विभागीय कार्यवाह व मुंबई अध्यक्ष देविदास पंडागळे यांनी सांगितले.सदर बेमुदत संप आंदोलनात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या समाविष्ट करण्यात आल्या असून, त्यामध्ये प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत-




मागण्या १} माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी बक्षी समितीच्या शिफारसीनुसार सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षांचा लाभ तात्काळ लागू करावा.२} शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती तातडीने सुरू करावी.३} पात्र शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विनाअट शिक्षक पदावर पदोन्नती द्यावी व दि. २५ मार्च २०२६ चा शासन निर्णय रद्द करावा.४} चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची पदे कंत्राटी पद्धतीने न भरता शासन स्तरावर भरावीत.

या मागण्यांसाठी राज्यभरातील शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होणार असल्याने शिक्षण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# बालाजी मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारींचा एल्गार

### तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना ज्वलंत प्रश्नांवर निवेदन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली रिसोड तालुक्यातील विविध ज्वलंत प्रश्नांवर तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदन सादर करण्यात आले. तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात जल जीवन मिशन अंतर्गत गावोगावी कामे सुरू असतानाही प्रत्यक्षात नागरिकांना नळाद्वारे पाणी मिळत नसल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला. “योजना नेमकी ग्रामस्थांसाठी की फक्त निधी खर्चासाठी?” असा सवाल उपस्थित करत तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच, 2026 चा पिकविमा तातडीने



शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा व सरकारने जाहीर केलेली १७,५०० रुपयांची मदत लवकरात लवकर मिळावी, अशी मागणी करण्यात आली. सध्या पिकविमा योजना शेतकऱ्यांपेक्षा विमा कंपन्यांच्या फायद्याची ठरत असल्याचा आरोपही संघटनेने केला.

खरीप हंगाम तोंडावर असताना खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या विक्रेत्यांवर कडक कारवाई करावी, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. तसेच, पोखरा योजनेत घोटा, हराळ, चिखली व कवठा सर्कलमधील सर्व गावांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली.

कृषी उत्पन्न बाजार समिती, रिसोड येथे माल विक्रीस आणणाऱ्या शेतकऱ्यांना लिलाव पट्टी देण्यात यावी, तसेच घरकुल लाभार्थ्यांना शासनाने जाहीर केलेली ५ ब्रास रेती अद्याप मिळालेली नसल्याने ती तात्काळ उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

याशिवाय, सोलर कंपन्यांकडून प्रलंबित असलेले सोलर पंप त्वरित शेतकऱ्यांच्या शेतात बसवण्यात यावेत, अशी ठोस मागणी करण्यात आली. या सर्व मागण्या लवकरात लवकर मान्य न झाल्यास तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला.यावेळी जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे पाटील, गजुअण्णा पैठणकर, तुकाराम बोडखे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रिक्षा–टॅक्सीचालकांसाठी मराठी अनिवार्य : निर्णयाविरोधात निषेध

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : महाराष्ट्रातील लाखो ऑटोरिक्षा - टॅक्सी चालकांची उपजिवीका नष्ट करून त्यांचे कुटुंब उद्धवस्त करण्याचा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा डाव आम्ही आंदोलन करून हाणून पडणार असल्याचा इशारा कामगार नेते शशांक राव यांनी सोमवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.यावेळी ऑटो रिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र चे कार्याध्यक्ष मारुती कोंडे म्हणाले, परिवहन मंत्री यांनी या प्रकरणी गांभीर्याने विचार करावा व हा निर्णय मागे घ्यावा. रिपब्लिकन रिक्षा टॅक्सी चालक मालक संघटनेचे कल्याण शहराध्यक्ष मोहन पाठारे म्हणाले, सरकारने परवाना देण्याअगोदर विचार केला पाहिजे होता. १ मे, २०२६ पासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सीचालक निषेध आंदोलन करणार आहेत.




महाराष्ट्रात १५ वर्ष वास्तव्यास असलेल्यांनाच ऑटोरिक्षा टॅक्सीचे परवाने दिले जातात. परवाने देताना त्यांची पोलिस पडताळणी केली जाते व त्यानंतर ऑटोरिक्षा टॅक्सी चालकांना परवाने दिले जातात. राज्यात बेकायदेशीररीत्या परिवहन मंत्रालयाच्या कृपेने बाईक टॅक्सी सुरू आहे आणि या सेवेवर जाणिवपूर्वक कारवाई केली जात नाही.आता आम्ही रिक्षा-टॅक्सीचालकांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन २८ एप्रिल रोजी परिवहन मंत्री यांना देणार आहे. ४ मे, २०२६ पासून रोज शहरी व ग्रामीण भागांमध्ये प्रमुख ठिकाणी ऑटोरिक्षा टॅक्सी चालक निदर्शने करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# पहिले दाम नंतर काम आम आदमी पार्टी कडून आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू

**दैनिक युवक आधार**

**कळमनुरी** : कळमनुरी तालुक्यातील आसोलवाडी मुंडळ ते मोरगव्हान रस्त्याचे काम आणि निकुष्ट दर्जाचे व अंदाजपत्रकानुसार न करता कनिष्ठ अभियंता उपअभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांनी संगणमत करून करोडो रुपयांच्या रस्त्यामध्ये अपहार केल्याचा आरोप आप कडून करण्यात आलेला आहे. संबंधित प्रकरणांमध्ये अनेक वेळा चौकशी करण्यासंदर्भामध्ये तक्रारी अर्ज



देऊन सुद्धा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना कार्यालयाकडून कुठलीही कारवाई न झाल्यामुळे आजचे जिल्हाप्रमुख यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण चालू सदरील रस्त्याची विभागीय चौकशी करण्यात यावी तसेच गुणवत्ता चाचणी करून संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याच्या मागण्या संदर्भामध्ये आमरण उपोषण जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देऊन उपोषण चालू केले आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वांगणसुळे व खोबळा गावांतील जलसंधारण कामे बंद केल्याने आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : सुरगाणा तालुक्यातील वांगणसुळे व खोबळा या गावांतील जलसंधारणाची बंद पडल्याने ग्रामस्थांनी तहसीलदार कार्यालय, सुरगाणा येथे निवेदन सादर करून तीव्र नाराजी व्यक्त केली. निवेदनात, संबंधित कामांबाबत आमदार नितीन पवार यांच्या तक्रारीमुळे बंधाऱ्यांची कामे थांबली असल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे.

सन १९८२ साली बांधण्यात आलेला वांगणसुळे येथील तलाव सध्या मोठ्या प्रमाणात गाळाने भरला असून पाणी साठवण्याची क्षमता कमी झाली आहे. पूर्वी मोठ्या प्रमाणात पाणी साठवणारा तलाव आज उथळ बनल्याने पावसाचे पाणी साठत नाही. परिणामी, दरवर्षी उन्हाळ्यात गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण होत आहे. तसेच वांगणसुळे व खोबळा या दोन गावांमध्ये सुरू असलेली जलसंधारण व बंधाऱ्यांची कामे अचानक बंद पडल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. या कामांमुळे परिसरातील पाणीपातळी वाढण्यास मदत होणार होती; मात्र कामे ठप्प झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या सर्व कामांसाठी शासन स्तरावरून सुमारे रु,२२०.७८ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच गावासाठी मंजूर असलेला रु ३४ लाखांचा लघु पाटबंधारे प्रकल्प अद्याप अपूर्ण असून त्याचे कामही रखडले आहे. निधी उपलब्ध असूनही




ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन

प्रत्यक्षात कामे सुरू नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.तलावातील गाळ काढणे, वाहत येणाऱ्या पाण्याचे मार्ग मोकळे करणे आणि वांगणसुळे व खोबळा येथील बंद पडलेली जलसंधारण कामे तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून प्रशासनाने त्वरित कार्यवाही न केल्यास वार. बुधवार दि. २२ पासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# पारवे आणि जावळे परिवाराचा मंगल परिणय प्रसंगी नवा आदर्श पुस्तकं रुपी भेट

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी मी कवयित्री आम्रपाली पारवे आणि ऋषिकेश जावळे यांचा मंगल परिणय घडून आला तरी,खर पाहायला गेलं तर आपण नेहमी पाहतो लग्न म्हटलं की अफाट खर्च,सोने नाणे, खरेदी,भांडी,पैशाची मोठी उलाढाल होत असते,तशी आमच्याही लग्नात झाली,परंतु आम्ही दोघे ही उच्चशिक्षित असल्यामुळे आम्ही थोडासा वेगळा विचार समजापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला तो म्हणजे "बुद्ध तुकोबा शिव शाहू फुले आंबेडकर" यांचा विचार समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत जावा.लग्नात आलेल्या प्रत्येक प्रतिष्ठित, आदरणीय,गुरुवर्य,आप्तेष्ट,नातेवाईक मंडळींना साडी,चोळी,कपडे इ वस्तू आहेर म्हणून न देता पुस्तके ही भेट दिली,सत्कार समारंभात नारळ,शाल आणि पुष्पगुच्छ न देता पुस्तक देऊन सर्व मान्यवरांचा सत्कार केला.त्या पुस्तकात मध्ये आम्ही गुलामगिरी महात्मा ज्योतिबा फुले,शेतकऱ्याचा आसूड महात्मा ज्योतिबा फुले,जातीव्यवस्थेचे निर्मूलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर,शिवाजी कोण होता? गोविंद पानसरे,देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे प्रबोधनकार



ठाकरे,दगलबाज शिवजी प्रबोधनकार ठाकरे, अशी समाजाच्या उपयुक्त असणारी 500 पेक्षा अधिक पुस्तके भेट म्हणून दिली.ही पुस्तके 11 एप्रिल 2026 रोजी मंगल परिणय प्रसंगी कन्हैया लॉन्स मांजरसुंबा या ठिकाणी तसेच 14 एप्रिल 2026 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निम्मित जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वैद्यकीन्ही या ठिकाणी तसेच 17 एप्रिल 2026 रोजी मोठा भाव धनराज पारवे यांच्या जन्मदिनानिमित्त अनुसूचित नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा पाटोदा या ठिकाणी ही सर्व पुस्तके आणि खाऊ वाटप केला.पुस्तके सदिच्छा भेट म्हणून देण्याचं कारण असं आहे की पुस्तके वाचली पाहिजेत जो वाचेल त्याच मस्तक सुधारेल आणि हे सुधारलेल मस्तक कोणापुढे नतमस्तक होणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "शिक्षण हे वाघिणीच दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही" म्हणून आम्ही पुस्तकं वाचली पाहिजेत पुस्तकाप्रती प्रेम जिव्हाळा निर्माण झाला पाहिजे कारण आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा गुरु जर कोण असेल तर ते आपण वाचलेली पुस्तके आहेत. हल्ली मोबाईल मध्ये आणि रीलसमध्ये अडकून गेलेल्या माता भगिनी,बहीण भाऊ परत पुस्तकांशी बोलावेत म्हणून आम्ही हा उपक्रम हाती घेतला आहे.आम्ही जेव्हा इतिहास वाचतो तेव्हा आम्हाला इतिहास समजतो आणि आम्ही नवा इतिहास घडवू शकतो म्हणून वाचन गरजेच आहे आपण जर वाचले तरच या व्यवस्थेला आपण प्रश्न विचारू शकतो.आपल्या बुद्धीवर चढलेला गंज हा पुस्तक वाचल्यावर नक्कीच निघतो म्हणून वाचल पाहिजे. बऱ्याचदा आम्ही पाहतोय आणि हल्ली तसे काही उदाहरण आपल्या समोर येत आहेत अंधश्रदेत कशा पद्धतीने लोक पुरुष महिला अडकून स्वतःच जीवन बरबाद करत आहेत म्हणून ही अंधश्रद्धा कुठेतरी थांबली पाहिजे जेव्हा लग्नाची तारीख ही शनिवारी येते अस समजल्यावर बऱ्याच लोकांचे मला कॉल आले मुहूर्त पाहिलाय का? शनिवारी लग्न येत आहे मग शनी वगेरे मागे लागतो अस बरंच काही!!! अशा भोगस रूढी ला दुजोरा न देत कुठला मुहूर्त न पाहता कुठल्या ही पंडिताकडे न जाता आम्ही एकाच गोष्टीवर ठाम राहिलो ते म्हणजे लग्नाची तारीख ही मुलींच्या शिक्षणाचे उद्धारक क्रतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच औचित्य साधून आम्ही 11 एप्रिल 2026 रोजी हा आमचा मंगल परिणय सोहळा अगदी आनंदात उत्साहात पार पाडला आणि समाजात एक नवीन आदर्श उभा करण्याचा प्रयत्न केला. तरी अशा मोठ मोठ्या कार्यात तुमच्या माझ्यासारख्या तरुण तरुणीने अशा मोहिमा राबवणे मला योग्य वाटते, आपल्याला जमेल तेवढे आपण करण्याचा नक्कीच प्रामाणिक प्रयत्न आपण नक्की करू,आपण महामानव नाही होऊ शकत पण त्यांचे अनुयायी होण्याचा प्रयत्न करू हाच या मागचा हेतू आहे.तरी बुद्ध तुकोबा शिव शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारधारेत जगताना जीवनसाथी ऋषिकेश जावळे यांची साथ लाभावी तरी त्यांना मंगल परिणयाच्या हार्दिक शुभेच्छा त्यांचाही यात सिंहाचा वाटा आहे,अशीच त्यांनी मला माझ्या सांसारिक आणि सामाजिक जीवनात साथ द्यावी हीच अपेक्षा

# निफाड येथील रिव्हर साइड गोल्फ कोर्स क्लबच्या वतीने आयोजित "चॅम्पिअन्स ऑफ लाईफ" शिबिराला मोठ्या उत्साहात सुरवात

**निफाड (नाशिक ) गोल्फच्या सुविधांचा फायदा खेळाडूंनी करून घाव्या - दिलीप बनकर, आमदार, पिंपळगाव बसवंत.**

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : गोल्फ खेळ सर्वदूर आणि विशेषतः ग्रामीण भागामध्ये रुजविण्यासाठी आणि तळागाळातील खेळाडू घडविण्यासाठी नाशिकच्या निफाड येथील रिव्हर साइड गोल्फ कोर्स क्लबच्या वतीने आणि प्रोट्स स्पोर्ट्स आणि साई बाबा सेवाश्रम यांच्या सहकार्याने 'चॅम्पियन फॉर लाईफ' या उपक्रमाचा शुभारंभ आज दिनांक १९ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. गोल्फ या खेळाच्या माध्यमातून वंचीत खेळाडूंना चांगली संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने "चॅम्पियन फॉर लाईफ" या उपक्रमा अंतर्गत टॅलेंट हंट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये वय वर्षे सात ते अकरा आणि बारा ते सतरा असे दोन वयोगट आहेत.




या उपक्रमाचे उदघाटन नाशिकच्या पिंपळगाव बसवंतचे आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते आणि विंग कमांडर अरुणकुमार सिंग,मा. जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, क्रीडा संघटक अशोक दुधारे, भारताचे चीफ कोच इंद्रजित बालोटिया आणि रिव्हरसाईड गोल्फ कोर्सचे संचालक आणि या उपक्रमाचे प्रमुख विंग कमांडर प्रदीप बागमार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी बोलतांना आमदार दिलीप बनकर यांनी बोलतांना सांगितले की, निफाड येथे विंग कमांडर प्रदीप बागमार यांनी गोल्फ या खेळाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत, आणि हा खेळ तळागाळापर्यंत जावा यासाठी असे विविध उपक्रम राबवत आहेत. तसेच या खर्चिक खेळासाठी लहान वयोगटाच्या खेळाडूंना मोफत प्रशिक्षण आणि सुविधा देत आहेत. त्यामुळे नाशिकच्या खेळाडूंनी याचा उपयोग करून घेत या खेळामध्ये नाशिकचे नाव राज्यात, भारतात आणि जगामध्ये उज्वल करावे असे सांगितले. या खेळाच्या प्रगतीसाठी ज्या-ज्या प्रकारे मदत आवश्यक आहे या सर्वांची पूर्तता केली जाईल असे सांगितले. यावेळी रवींद्र नाईक सांगितले की, हा ऑलिंपिक खेळ आहे. आणि मुलांसाठी अश्या प्रकारे उपक्रम राबवून खऱ्या अर्थाने उत्तम सुरवात होत आहे, कारण शालेय स्तरापासूननच खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत जातो असे सांगितले. चीफ कोच इंद्रजित बालोटिया यांनी सांगितले की, या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना गोल्फचे प्रशिक्षण देणे आणि मुलांचा विकास करणे हा आहे. याचाच एक भाग म्हणून या निफाड परिसरातील ३०० मुलांची निवड केली जाणार आहे, आणि उपक्रमाच्या माध्यमातून नाशिकमधून दर्जेदार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्याचा आमचा मानस आहे असे सांगितले.

या शिबिरामध्ये निफाड, पिंपळगाव, आणि नाशिकच्या १३ शाळांचे एकूण ४३० खेळाडू सहभागी झाले आहेत. हे सर्व खेळाडू आणि त्यांचे शिक्षक तसेच परिसरातील नितीन कदम, शंकरराव वाघ, सायली पालखेडकार, अँड. संजय पाटील-देरेकर, अँड. अरविंद बडवर, वी. दा. व्यवहारे, डॉ. मनोज बर्डे, निरभवाने सतीश मोरे, संजय पवार, सौ. मिनाक्षी जगदाळे, ह. भ. प. संगीताताई गुंजाळ, सौ. ज्योत्स्ना सुरवाडे, गणेश गुरव, साहिल शेख, समीर हमीद शेख, दीपक गोपाळे, सागर डोखळे, प्रदीप राठोड, आकाश अहिरे यांची उपस्थिती होती.

# शिवशाही बस आणि बस स्थानकांच्या अस्वच्छतेवर प्रवाशांचा रोष; मूल्यांकन समितीची पाहणी व्यर्थ?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बस स्थानक स्वच्छता अभियान महाराष्ट्रभर राबवले जात असताना बस स्थानकातील स्वच्छता गृह, कॅन्टीन, स्टँडमधील बाकडे आणि विश्रांतीगृहांची साफसफाई होतेय की नाही, याची पाहणी मूल्यांकन समित्या करून गेल्या. पण उदाहरणार्थ रेवदंडा बस स्थानकात समिती येऊन गेली तरीही ते निकृष्ट दर्जेचेच राहिले आहे. अलिबाग-पनवेल मार्गावरील वातानुकूलित शिवशाही बस तर अत्यंत खराब अवस्थेत धावत आहेत. दिवसभर फेऱ्या चालू असतात, पण बसची स्वच्छता कधी होते? AC ब्लोअर तुटलेले किंवाच नसलेले, सीट तुटलेल्या, पडदे-सीट कव्हर वर्षानुवर्षे धुतले जात नाहीत. अलिबागहून पनवेलला गेली की लगेच पनवेलहून प्रवासी भरून परत अलिबागला, आणि पुन्हा तशीच अस्वच्छ बस पनवेलकडे! खूप उत्पन्न देणाऱ्या या मार्गावरही स्वच्छतेसाठी 'स्वच्छता शुल्क' लावावे, जसं स्वच्छता गृहासाठी आकारले जाते, अशी प्रवाशांमध्ये जोरदार चर्चा आहे.

लालपरी आणि साध्या बसांमध्ये अपघातकाळीन दरवाजे रश्शीत बांधलेले, खिडक्या सरकत नाहीत, वर्षानुवर्षे समस्या कायम.बसवर अपुऱ्या नेपलेट्स, ड्रायव्हर तंबाखू-गुटखा खाऊन बसतेच (जाग्यावर) थुंकतात, त्यामुळे रोगराई पसरते आणि हे सर्व कोण स्वच्छ करणार? अशा ड्रायव्हरांवर शासनाने कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी करत आहेत. "येवा कोकणातच असा




**अलिबाग-पनवेल मार्गावर खटाऱ्या शिवशाही; २ रुपये स्वच्छता कराच्या नावाने लूट! तंबाखू थुंकलेल्या बस;जनरोष वाढला !**

खटारा डबा, अस्वच्छ गाड्या!" असा रोष व्यक्त होत आहे.

*परिवहन मंत्र्यांनी स्वतः पाहणी करावी*

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वतः या मार्गावरील बस आणि स्थानकांची पाहणी करून प्रवाशांच्या स्वच्छता तक्रारींवर चर्चा करावी, अशी मागणी होत आहे. खूप उत्पन्न असलेल्या या मार्गावर स्वच्छता शुल्क लावून सुधारणा व्हाव्यात, अन्यथा जनतेच्या नजरेसाठी सरनाईकांची चाचपणी होईल. *अलिबाग डेपो मॅनेजर देवरे म्हणाले*, "अलिबाग बसस्थानकातील शिवशाही आणि साध्या बसांमध्ये अपुऱ्या स्वच्छ सुविधा पूर्ण केल्या जातील, याकडे लक्ष दिले जाईल." पण प्रत्यक्षात काहीच बदल दिसत नाही.

प्रवाशांच्या या तक्रारी शासनाच्या कानावर शिट्टी वाजवणाऱ्या आहेत. परिवहन विभाग कधी सुधारेल, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

रेवदंडा प्रवासी ॲड विनोद नाईक: "मूल्यांकन समिती आली-गेली, बस स्थानक अजूनही कचऱ्याचा ढीग! बाळासाहेबांचे स्वच्छता अभियान फक्त कागदावर? सरनाईक साहेब स्वतः येऊन पहा, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरू!"

अलिबाग-पनवेल नियमित प्रवासी श्रेया पाटील: "शिवशाही बस AC च्या नावाने लूट! ब्लोअर तुटले, सीट गलिच्छ, ड्रायव्हर गुटखा थुंकतात. २ रुपये स्वच्छता कर लावलात पण स्वच्छता कुठे? महिला प्रवाशांना बसायलाही लाज वाटते!"पनवेल स्टँडवर ताटकळणारा चाकरमानी: "रात्री ८:३० नंतर बस नाही, स्वच्छता गृह गलिच्छ, कॅन्टीन बंद. उत्पन्न भरपूर मार्गावरही ही वेळ? सरनाईकांसाठी जनतेची चाचपणी!"

# संजय कदम यांचे नागोठणे शिवसेना शाखेला सदिच्छा भेट ; शाखेच्या वतीने झाला सत्कार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : नागोठणे येथील विभागीय शिवसेना शाखेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनियुक्त दक्षिण रायगड जिल्हा संपर्कप्रमुख संजय कदम यांनी रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांच्या समवेत नागोठणे विभागीय शिवसेना शाखेला शनिवार 18 एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता सदिच्छा भेट दिली. यावेळी प्रसाद भोईर व संजय कदम यांचा शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन करून विविध संघटनात्मक धोरणांवर सकारात्मक चर्चा केली.

शिवसेना शाखेत प्रथमच आलेल्या संजय कदम यांचा नागोठणे च्या वतीने शाल व



श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रसाद भोईर यांनी कोणीही कोणत्याही पक्षात गेला काय आणि आला काय त्याकडे लक्ष न देता आपल्या पक्षप्रमुखांसारखे न डगमगता आपण आपल्या पक्षाचे काम निष्ठेने करत राहून आपण सर्वांनी संघटित होऊन पक्षप्रमुखांना बळ देण्याचे काम करू या असे सांगून आपण ज्या पदावर आहात त्या पदाला न्याय देण्यासारखे समाजकार्य करा त्यातूनच तुम्ही समाज कारणासह राजकारणात पुढे जाणार आहात याची जाणीव सर्वांनी ठेवण्याचा महत्वपूर्ण सल्ला शेवटी भोईर यांनी दिला. संजय कदम यांनी माझ्या कामाची सुरुवात मी कार्यकर्ता म्हणूनच केली असून कार्यकर्ता म्हणून काम करत असताना एक वेगळाच आनंद मिळत असल्याचे सांगून आपण निर्माण केलेल्या कार्यामुळे प्रत्येक निवडणुकीपूर्वी एक वेगळेच वातावरण निर्माण होत असल्याचे शेवटी संजय कदम यांनी सांगितले.यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी जिल्हा प्रमुख विलास गोळे, जिल्हा उपसंघटिका दर्शना जवके, उपतालुका प्रमुख गणपत म्हात्रे, उपविभाग प्रमुख बळीराम बडे, शाखाप्रमुख राजेश सुर्वे, शहर संपर्कप्रमुख मुकेश भोय, उपशाखाप्रमुख पंकज कामथे, ग्राम पंचायत सदस्या ज्योती राऊत यांच्यासह बाळू रटाटे, गंगाराम मिणमिणे, लहू तेलंगे, सुरेश गायकर, छविदास कोतवाल, संदीप राऊत, प्रकाश मेस्त्री, इम्रान पानसरे, कैलास गोरे, प्रवीण चितळे, सुभाष बामणे, श्रीराम मांगले, सलीम आख्तर,नागेश सुर्वे तसेच शहरासह विभागातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा येथे भगवान परशुराम जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा शहरात रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी भगवान परशुराम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील प्रसिद्ध भामेश्वर मंदिर येथे परशुराम जयंती निमित्त प्रतिमा पूजन करून भगवान परशुराम यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक दिक्षित काका यांच्या हस्ते प्रतिमा पूजन पार पडले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी भगवान परशुराम यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांचा समाजाने अंगीकार करावा, असे प्रतिपादन केले. या प्रसंगी माजी नगरसेवक विजय जोशी, पाटोदा तालुका पत्रकार संघाचे सचिव ॲड.महेश बेदरे, ब्राह्मण महासंघाचे तालुकाध्यक्ष प्रशांत देशमुख, माजी सभापती संदीप जाधव, राहुल देशमुख, अमोल जोशी, गणेश खिस्ते, गणेश पांडव, दिक्षित काका, पत्रकार सुनील नाईकनवरे, बलुतेदार सेवा सोसायटीचे चेअरमन दिगंबर नाईकनवरे, गिरीश पांडव, गोविंद पांडव, विनायक पांडव, खाडे, तांबे, बाळासाहेब शिंदे, श्रीकांत धसे, संकेत कुलकर्णी, अनिकेत पारगावकर, हरिभाऊ राऊत, उदय देशमुख, सतीश गोरे, डॉ.रवींद्र गोरे, समाजबांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भगवान परशुराम जयंती निमित्ताने पाटोदा शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# राळेगणसिद्धीत दिपक बिरारे यांना ‘राष्ट्रीय कृषिरत्न पुरस्कार २०२६’ प्रदान



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : कन्नड येथील कृषी विभागातील उप अधिकारी दिपक बिरारे यांना राळेगणसिद्धी या पावन भूमीत आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था तसेच राष्ट्रीय पर्यटन विकास व सांस्कृतिक कला महोत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिपक बिरारे (उप कृषी अधिकारी, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) यांना “राष्ट्रीय कृषिरत्न पुरस्कार २०२६” प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

हा प्रतिष्ठेचा पुरस्कार समाजसेवेचे दीपस्तंभ डॉ. अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी तिहाड जेल,दिल्लीचे अतिरिक्त जेल अधीक्षक अजय भाटिया तसेच संस्थेचे अध्यक्ष देवा तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि गौरवशाली वातावरणात पार पडला. दिपक बिरारे यांनी कृषी क्षेत्रात राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे, शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्यामुळे आणि प्रभावी विस्तार सेवेमुळे हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे अनेक शेतकऱ्यांना दिशा मिळाली असून कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत झाली आहे.या पुरस्कारामुळे केवळ त्यांचा नव्हे, तर संपूर्ण कृषी क्षेत्राचा गौरव वाढला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.काही काळ सोयगाव तालुक्यात सुद्धा त्यांनी सेवा दिली आहे..

# श्रीवर्धनमध्ये 'फोरकॉन' कंपनीच्या मुजोरीला लोकप्रतिनिधींचा लगाम

## खचलेले रस्ते अन् ढासळलेल्या पिचिंगची प्रत्यक्ष पाहणी!

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन वार्ताहर** : श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील नारायण पाखाडी उत्तर विभाग ते सावरकर चौक दक्षिण विभाग दरम्यानच्या रस्त्यांची 'फोरकॉन' कंपनीच्या अवजड वाहतुकीमुळे दाणादाण उडाली आहे. या गंभीर प्रश्नावर नवनिर्वाचित नगरसेवकांनी आक्रमक पवित्रा घेत कंपनीला धारेवर धरले असून, प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन प्रशासकीय यंत्रणेला जाब विचारला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून तरी बंदर दांडा परिसरात सुरू असलेल्या बांधकामासाठी 'फोरकॉन' कंपनीमार्फत माती आणि दगडांची वाहतूक केली जात आहे. मात्र, ही वाहतूक करताना मर्यादेपेक्षा जास्त भार (ओव्हरलोड) वाहून नेला जात असल्याने रस्त्यांची क्षमता संपली आहे. परिणामी, रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून बाजूचे पिचिंगही पूर्णपणे ढासळले आहे. या दुरवस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.





महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती सुप्रिया कैलास चोगले यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आक्रमक पवित्रा घेतला. त्यांच्या पुढाकाराने भाजपाचे नगरसेवक प्रणील बोरकर आणि राष्ट्रवादीचे नगरसेवक प्रसाद विचारे यांनी फोरकॉन कंपनीचे डीपीएम काशिनाथ पाटील यांच्यासह बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी नगरसेवकांनी कंपनीच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला. लोकप्रतिनिधींच्या या आक्रमक भूमिकेपुढे अखेर कंपनीने नमते घेत, झालेले नुकसान तातडीने दुरुस्त करण्याचे मान्य केले आहे.

केवळ स्थानिक पातळीवरच नव्हे, तर हा प्रश्न आता थेट राज्यस्तरावर पोहोचला आहे. राष्ट्रवादीचे नगरसेवक प्रसाद विचारे यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदितीताई तटकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेमध्ये हा विषय अत्यंत प्रभावीपणे मांडला.

मंत्र्यांच्या कानावर हा विषय गेल्यामुळे आता नगरपरिषद प्रशासन आणि कंपनीवर मोठा दबाव निर्माण झाला आहे.

उपसभापती सुप्रिया चोगले यांनी दिलेल्या निवेदनात प्रशासनाला आणि कंपनीला काही महत्त्वाचे प्रश्न विचारले आहेत या प्रकरणाची प्रत मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांनाही पाठवण्यात आली आहे. सत्ताधारी आणि विरोधक या प्रश्नावर एकवटल्याने श्रीवर्धनमधील रस्ते दुरुस्तीचा मार्ग मोकळा होणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. आता 'फोरकॉन' कंपनी दिलेल्या आश्वासनानुसार किती लवकर काम पूर्ण करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे."विकासाच्या नावाखाली जनतेच्या हक्काचे रस्ते उद्ध्वस्त करणाऱ्यांना सोडणार नाही, ही केवळ सुरुवात आहे!" अशी भावना यावेळी स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

कराराची गुपितं काय?:

नगरपरिषद आणि कंपनी यांच्यात या वाहतुकीबाबत काही करार झाला आहे का? असल्यास त्याची माहिती सार्वजनिक करावी.

जबाबदारी कोणाची?:रस्ते नगरपरिषदेचे असताना खासगी कंपनीच्या फायद्यासाठी जनतेचे नुकसान का?

अल्टिमेटम:तातडीने पिचिंग आणि रस्ते दुरुस्त न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा.

# अक्षय तृतीया व भगवान परशुराम जयंतीनिमित्त विठ्ठल मंदिरात भक्तिमय धार्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड येथे अक्षय तृतीया आणि भगवान परशुराम जयंतीनिमित्त सर्व ब्राह्मण समाजाच्या वतीने स्थानिक श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात अत्यंत भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात रामरक्षा स्तोत्र आणि हनुमान चालीसा सामूहिक पठणाला विशेष महत्त्व देण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात विधीवत पूजा-अर्चनेने झाली. भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर वेद मंत्रांच्या गजरात वातावरण मंगलमय झाले. उपस्थित भाविकांनी एकत्रितपणे रामरक्षा स्तोत्राचे श्रवणीय आणि एकसुरात पठण केले. या वेळी मंदिर परिसरात अध्यात्मिक ऊर्जा आणि शांततेचा अनुभव सर्वांनी घेतला.

यानंतर हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करण्यात आले. युवक, महिला, तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. लहान मुलांनीही पठणात सहभागी होत धार्मिक संस्कारांचे सुंदर दर्शन घडविले. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान “जय श्रीराम” आणि “जय हनुमान”च्या घोषणांनी वातावरण दुमदुमले होते.

कार्यक्रमादरम्यान समाजातील प्रमुख वक्त्यांनी अक्षय तृतीयेचे महत्त्व स्पष्ट करताना या दिवशी केलेल्या दान, जप व पूजा यांचे विशेष पुण्य लाभते, असे सांगितले. तसेच भगवान परशुराम यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांनी धर्मसंरक्षण, शौर्य आणि आदर्श जीवनमूल्ये यांचा संदेश दिला.

या उपक्रमामुळे समाजातील एकोप्याला बळ मिळत असून, नव्या पिढीमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्यास प्रोत्साहन मिळत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व ब्राह्मण समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी पंचक्रोशीतील ब्राम्हण कुटुंब व ग्रामस्त उपस्थित होते. शेवटी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले आणि सर्वांनी समाधान व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणास तातडीने स्थगिती द्या

## नेवासा काँग्रेस व वंचीत बहुजन आघाडीचे तहसीलदार यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**(नेवासा प्रतिनिधी ) :** महाराष्ट्र शासनाने दहा एप्रिल रोजी अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरन करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. ही प्रक्रिया तातडीने बंद करण्याचे निवेदन नेवासा काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने तहसीलदार यांना दिले.



राज्य सरकारने सुरु केलेल्या उपवर्गीकरण प्रक्रियेमुळे अनुसूचित जातीमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.आरक्षणाच्या प्रक्रियेत बदल करताना पारदर्शकता,न्याय, आणि सर्वसमावेशक प्रक्रिया अपेक्षित असते, दुर्दैवाने सध्या सुरु असलेल्या उपवर्गीकरन प्रक्रियामध्ये पारदर्शकता दिसून येत नाही. उपवर्गीकरणासाठी केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती स्थापन केलेली असून यात समाजाचा एकही प्रतिनिधी यात समावेश नाही.तसेच समितीचा अहवाल जनतेसमोर सादर न करता केवळ आक्षेप मागितले जात आहे.याशिवाय अंत्यन्त घाई घाईत प्रक्रिया पूर्ण करण्याचा सपाटा लावला जात आहे.या सर्व गोष्टी संशयस्पद असल्यामुळे ही उपवर्गीकरण प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली.यावेळी दिलेल्या निवेदनात

उपवर्गीकरण समितीचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा,राज्यभरात जणसूनावण्या घेण्यात याव्या.व जनतेची मते विचारात घेण्यात यावी,सर्व आक्षेप, सूचना विचारात घ्याव्यात व नंतरच अंतिम निर्णय घ्यावा.या मागण्या करण्यात आल्या.यावेळी काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी उपवर्गीकरण प्रक्रिया ही अंत्यन्त गंभीर असून अनुसूचित जातीवर अन्याय करणारी आहे,त्यामुळे तातडीने ही प्रक्रिया बंद करावी.वंचित अध्यक्ष पोपटराव सरोदे यांनी अनुसूचित जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम हे सरकार करत आहे.

काँग्रेसचे अंजुम पटेल यानी उपवर्गीकरणामुळे राज्यातील अनुसूचित जातीमध्ये तीव्र असंतोष पसरला असून लवकरच याविरोधात मोठे आंदोलन उभारणार असे स्पष्ट केले. निवेदनावेळी वंचितचे उपाध्यक्ष संदीप क्षीरसागर, महासचिव गणपत मोरे,युवा नेते हरीश चक्रनारायण,संजय वाघमारे,काँग्रेसचे सतीश तऱ्हाळ,गोरक्षनाथ काळे, संजय होडगर आदी उपस्थित होते.यावेळी तहसीलदार यांनी निवेदन स्वीकारले.

# हातात संविधान घोड्यावर बसून वधूची लग्नमंडपात एन्ट्री

## निमगाव जाळीत परिवर्तनवादी लग्न सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी (ज्ञानेश्वर साबळे) :** विविध धर्मातील पाच धर्मगुरू समवेत हातात संविधान घेऊन वधूचा घोड्यावर बसून लग्न मंडपात प्रवेश आणि उपस्थित सजग जनसमुदाय संविधानाच्या साक्षीने संगमनेर तालुक्यातील निमगाव जाळी येथे विश्वदीप वाघमारे आणि विदिशा मुन्तोडे या नवदाम्पत्याचा लग्न सोहळा मोठ्या थाटात पार पडला.तालुक्यातील कोंची येथील नालंदा बौद्ध आश्रमाचे प्रमुख धर्मगुरू महाबोधी करुणानंद बोधी यांचे ज्येष्ठ चिरंजीव विश्वदीप व शिबलापूर येथील दिवंगत रविंद्र राजू मुन्तोडे यांची कन्या विदिशा यांच्या लग्न सोहळ्यासाठी राजकीय, धार्मिक,शासकीय सेवेतील आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रसंगी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. भारतीय संविधानामुळे आज महीलाना जगण्याचा अधिकार मिळाला,

महिलाचा गौरव व्हावा म्हणुन आदर्श बौध्द नववधु विदिशा हिस घोड्यावर बसून हातात भारतीय संविधान उध्देशिका डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिमा सोबत घेऊन आदर्श दिलाअसाच सर्वांच्या भाषणाचा सुर होता.यावेळी ॲड.किरण रोहमपरिमल निकम,रमणलाल शिंगवी अर्चना राम गायकवाड चरण त्रिभुवन,शिवाभाऊ साठे प्रदिप थोरात नाथा आल्हाट संदीप खरात,विनोद गायकवाड, रमेश रूपवते फिरोजशहा पठाण,बंटी यादव सचिन साळवे उपस्थित होते

# चॅम्पियन चषकाचा मानकरी भवानी नडगाव संघ ; " मलिकावीर 'किताब विवेक किजबिले '

**दैनिक युवक आधार**

**मुंबई | सुजित धाडवे** : महाड ग्रामीण टेनिस क्रिकेट असोसिएशन (मर्या.) यांच्या वतीने भव्यदिव्य चॅम्पियन चषक 2026 चे दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे या चषकाचे पाचवे वर्ष शिस्तबद्ध वातावरणात नवी मुंबई दिघा पटणी मैदान येथे दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेत तालुका महाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे 32 नोंदनीकृत क्रिकेट संघ या स्पर्धेत खेळले. या चॅम्पियन चषकाचा विजेतेपद भवानी नडगाव क्रिकेट अ संघानी पटकावले तर मालिकावीर किताबाचा मानकरी विवेक किजबिले ठरला.



यावेळी महाड पंचायत समिती सदस्य संदीप खिडबिडे, शिरगांव ग्रामपंचायत सरपंच सोमनाथ ओजर्डे, मुंबई गुमास्ता चेअरमन सुदाम वाडकर, समाजसेवक सुदेश चोरगे, समाजसेवक सुनील वाघरे, समाजसेवक राहुल गायकर यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्पर्धे दरम्यान सदिच्छा भेट दिली. आयोजकांकडून पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

अंतिम सामन्यात भवानी नडगाव अ संघाने दमदार खेळ करत विजेतेपद पटकावले तर सोमजाई क्रिकेट क्लब भेलोशी (अ) उपविजेतेपद मिळवले,श्री. कांळबादेवी क्रिकेट संघ खैरे संघाने तृतीय क्रमांक आणि हनुमान स्पोर्ट्स क्लब सोनघर संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.या स्पर्धेचा उत्कृष्ट फलंदाजाचा किताब अक्षय अबगुल पटकावला तर उत्कृष्ट गोलंदाज संकेत यादव ठरला, मालिकावीर विवेक किजबिले यांनी वैयक्तिक किताब पटकवला.या दोन दिवसीय क्रिकेट सर्वच स्पर्धा विशेष रंगल्याने प्रेषकांनी क्रीकेटचा मनमुराद आनंद लुटला. यादरम्यान मॅन ऑफ द मॅच' बॅटिंग, बॉलिंग किंवा फिल्डिंगमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली आहे, अशा खेळाडूंना टीशर्ट देण्यात आले, तसेच सहभागी संघाना सन्मानचिन्हे देण्यात आले, ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी असोसिएशनच्या कार्यकारी समितीमध्ये अध्यक्ष ज्ञानेश्वर भुवड, कार्याध्यक्ष अमोल पवळेकर, सचिव संदिप चोरगे,खजिनदार विशाल देवळे, उपाध्यक्ष अजित देवळे, किशोर नाकते, उपखजिनदार महादेव तांबे, हिशोब तपासनीस संतोष पोळेकर, सल्लागार दिगंबर धाडवे,अमित मालप, विकास भुव ड,संकेत यादव, रोशन बैकर विश्वास नामोळे, सदस्य संकेत होडबे, वैभव मोरे, साहिल कोबनाक , प्रवीण पौळेकर, विनायक खेरटकर, जतीन मालुसरे यांच्यासह नोंदनीकृत संघाच्या खेळाडू सदस्य संघानी मेहनत घेतली. या क्रिकेट स्पर्धेचे सुंदर समालोचक दत्तात्रय क्षीरसागर, शिक्षक प्रल्हाद ठाकूर, हरेश गोलांबरे यांनी करून खेळाडूंना प्रोत्साहीत केले, पंच म्हणून राकेश मोरे आणि सहकारी सांभाळली, स्कोरिंगची जबाबदारी आयोजकांनी घेतली. ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंना प्रोत्साहित केले. तब्बल एक लाखा पेक्षा अधिक क्रिकेट रसिकांनी ही स्पर्धा थेट घरबसल्या यूट्यूब लाईव्ह द्वारे पाहून क्रीकेटचा मनमुराद आनंद लुटला अशी माहिती आयोजकांनी दिली.

असोसिएशनच्या अधीपत्याखाली 51 संघ नोंदनीकृत असून यांच्या नेतृत्वाखाली वर्षभरात 25 स्पर्धा खेळवण्यात आल्या होत्या, यामध्ये चॅम्पियन चषक मानाचा चषक मानला जातो.यावेळी विजेता संघाला आकर्षक चषक रोख रक्कम, व्यक्तीगत 'किताब पटकवणाऱ्या खेळाडूना घरी वापरण्यात येणाऱ्या वन मिक्सर, इस्त्री देण्यात आले. प्रतिवर्षी नव्या संघाला चॅम्पियन चषकाचा मानकरी बनता आल्याचे दिसून येत आयोजकच्या वतीने सांगण्यात आले.

# खारघरमध्ये 5-6 गाड्यांची एकमेकांना धडक ; पनवेल मार्गावर वाहतूक ठप्प



**दैनिक युवक**

**पनवेल ( वार्ताहर ) :** खारघर परिसरात सोमवारी दुपारच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. पनवेलकडे जाणाऱ्या मार्गिकेवर 5 ते 6 वाहनांची साखळी धडक झाल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली.मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी अचानक एका वाहनाने ब्रेक लावल्यानंतर मागून येणाऱ्या वाहनांनी एकमेकांना धडक दिली. या साखळी अपघातात अनेक चारचाकी गाड्यांचे मोठे नुकसान झाले असून काही वाहनांच्या पुढील भागाचे चेंदामेंदा झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि वाहतूक विभागाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले असून काही जणांना किरकोळ दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे पनवेलकडे जाणाऱ्या मार्गावर काही काळ मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत करण्याचे काम केले. दरम्यान, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून अधिक तपास सुरू आहे.

# सुमारे ३७० वर्षांची परंपरा लाभलेल्या भेंडवळ येथील घटमांडणीचे भाकीत जाहीर

## जोरदार पाऊस; पिकांचे नुकसान आणि स्थिर राजकीय परिस्थितीचा अंदाज

**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले** : सुमारे ३७० वर्षांपासूनची असलेली भेंडवळच्या घट मांडण्याची परंपरा आजही कायम आहे. काल अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर सूर्यास्ताच्या वेळी घटमांडणी करण्यात आली व आज सकाळी सूचीदयावेळी या घटमांडणीचे निरीक्षण करून वर्षभराचे पीक पाणी पाऊस राजकीय व देशाच्या संरक्षण स्थितीबद्दलचे अंदाज जाहीर करण्यात आले. यावेळी भेंडवळ परिसरासह मराठवाडा खानदेश व मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. भेंडवळच्या घटमांडणीतून मिळालेल्या अंदाजानुसार शेतकरी वर्षभराचं आपल्या पीक पाण्याचे नियोजन करत असतात, भेंडवळची घटमांडणी ही स्थानिक परंपरा असून अनेक शेतकरी त्यावर



विश्वास ठेवत असतात, यंदाच्या गट मांडणीतून निघालेले प्रमुख निष्कर्ष पिकांवर रोगराईचं प्रमाण जास्त असेल, कापूस, तांदूळ पिकाचे उत्पन्न भरपूर, ज्वारी, तूर, मूंग, उडीद, मटकी, जवस, वाटाणा ही पिके सर्वसाधारण असतील, तीळ, बाजरी हे पीक भरपूर येईल, देशाची संरक्षण स्थिती तणावात असेल, राजा कायम असेल तथापी देशाची आर्थिक स्थिती मजबूत राहणार नाही. पाऊस जूनमध्ये भरपूर, जुलै सर्वसाधारण, ऑगस्ट, सप्टेंबर कमी असेल... अनेक भागात महापुरामुळे नुकसान होणार. पर्जन्यमान, पिकांची स्थिती, शेतीमालाचे दर, देशातील राजकीय आणि आर्थिक स्थितीबाबत भेंडवळमध्ये दरवर्षी भविष्यवाणी करण्याची परंपरा आहे. गेल्या ३५० वर्षींपासून या घट मांडणीच्या आधारावर वर्षभराचे

राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि हवामानाचं भविष्य वर्तवलं जात आहे. शेती आणि पावसाविषयक निसर्गाचा सूक्ष्म अभ्यास गुढीपाडवा ते अक्षय्य तृतीया या काळात करून वर्षभराची भाकिते या घट मांडणीत करण्यात येते. ३५० वर्षीपूर्वी महान तपस्वी चंद्रभान महाराज वाघ यांनी ही घट मांडणी सुरु केली होती, आणि आता त्यांचे वंशजही परंपरा कायम ठेवून आहेत.

### घटमांडणी नेमकी कशी करतात?

**भेंडवळच्या घटमांडणीची परंपरेनुसार एक विशिष्ट पद्धत आहे. शेतात मध्यभागी खोल खड्डा करून त्या खड्ड्यात मातीचा घट मांडण्यात येतो. घटात चार मातीची ढेकळे, त्यावर पाण्याने भरलेली घागर आणि घागरीवर पापड, भजा, वहा, सांहोई, कुरडई ठेऊन घटाच्या बाजूला पान सुपारीसह विविध १८ प्रकारची धान्ये मांडली जातात, घटाच्या वर्तुळाकार अठरा धान्ये गहू, ज्वारी, तूर, उडीद, मूग, हरभरा, जवस, तीळ, भादली, करडी मसूर, बाजरी, तांदूळ, अंबाडी, सरकी, वाटाणा ही धान्ये मांडली जातात. घटमांडणीचे भाकीत ऐकण्यासाठी विदर्भ, खानदेश, मराठवाड्यासह अनेक भागातून शेतकरी भेंडवळमध्ये मुक्कामाला येतात, या परिसरात हजारोंच्या संख्येने शेतकरी एकत्रित जमतात. शेतकरीच नव्हे तर बी-बियाणे कंपन्यांचे प्रतिनिधीही शेतकऱ्यांचा आगामी काळातील कल लक्षात घेण्यासाठी येथे गर्दी करतात. शेतकरी वर्ग घटमांडणीचे भाकीत घेऊन पुढील हंगामाची पेरणी काय करायची, हे ठरवत असतात. पावसाची महिनावार माहिती आणि पीक परिस्थितीचा अंदाजही वर्तवण्यात येत असल्याने निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांसाठी ही घटमांडणी आशेचा किरण बनली आहे.**

# पनवेल महानगरपालिकेने दिला आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश

## खारघर हिल महापौर मॅरेथॉन प्रोमो रनला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन प्रोमो रन' या उपक्रमास नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर तसेच महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ वैभव विधाते उपस्थित होते.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या प्रोमो रनमध्ये ५ कि.मी. आणि १० कि.मी. गटांमध्ये तब्बल २५०० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाने एक सकारात्मक संदेश दिला आहे.




पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन उपक्रमांपैकी हा प्रोमो रन एक उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कार्यक्रम ठरला आहे. या यशस्वी आयोजनामुळे आगामी 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन: (ऑगस्ट २०२६) साठी भक्कम पायाभरणी झाली आहे. आगामी मॅरेथॉनमध्ये ५ कि.मी., १० कि.मी., २१ कि.मी. (हाफ मॅरेथॉन) आणि ४२ कि.मी. (फुल मॅरेथॉन) अशा विविध गटांचा समावेश असणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वच्छ आणि हरित पनवेल या ध्येयावर आधारित व नागरिकांशी सुसंवाद वाढविण्याच्या उद्देशाने सुरुवात केलेली ही पनवेल महानगरपालिकेची पहिली महापौर मॅराथॉन होती. यामध्ये संपूर्ण शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रोमो रन असल्याने २५०० नोंदणी करण्याबाबत नियोजन महानगरपालिकेने केले होते मात्र ते केवळ २ दिवसात नोंदणी पूर्ण झाल्याने अनेक धावपटूंना सहभाग घेता आला नाही. परंतु हा फक्त प्रोमो असून मुख्य स्पर्धेच्या वेळी सर्वांना सामावून घेण्याची घोषणा महापौरांनी केली. सदरच्या मॅराथॉन करिता लेट सेलिब्रिट फिटनेस क्लब व नवी मुंबई रनर्स असोसिएशन यांनी देखील विशेष मेहनत घेतली.

पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीस प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करत असून, "फिट पनवेल, हेल्दी पनवेल" या संकल्पनेला अधिक बळ देत आहे.

# "महिला आरक्षणावरून राजकारण तापलं : फडणवीसांचा विरोधकांवर हल्लाबोल, १ कोटी सह्यांची घोषणा"

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** लोकसभेत महिला आरक्षण विधेयक रद्द झाल्यानंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार टीका करत राजकीय वातावरण तापवले आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी डीएमके, एनसीपी (शरद पवार गट), समाजवादी पक्ष, उबाठा गट आणि काँग्रेसवर महिला विरोधी भूमिका घेतल्याचा गंभीर आरोप केला. "महिला आरक्षण विधेयकाची विरोधकांनी भ्रूणहत्या केली आणि त्यानंतर आनंदोत्सव साजरा केला, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे," असे म्हणत त्यांनी या कृतीला समाजसुधारकांच्या विचारांवर तांडव ठरवले.

फडणवीस यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षाचा उल्लेख करत विरोधकांनी त्यांच्या विचारांना तिलांजली दिल्याची टीका केली. त्यांनी डिलिमिटेशन प्रक्रियेचा संदर्भ देत स्पष्ट केले की, १९७१ च्या लोकसंख्येवर आधारित लोकसभा जागा निश्चित करण्यात आल्या होत्या आणि २००२ मध्ये दक्षिण भारतावर अन्याय होऊ नये म्हणून कालमर्यादा वाढवण्यात आली.२०२३ च्या संविधान दुरुस्तीमुळे महिला आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला असून, २०२९ पर्यंत हे आरक्षण प्रत्यक्षात लागू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना फडणवीस यांनी थेट आव्हान देत "माझ्या स्तरावरील कोणत्याही नेत्याने माझ्यासोबत ओपन डिबेट करावी," असे म्हटले. त्यांनी पुढे जाहीर केले की महिला आरक्षणासाठी जनमत तयार करण्यासाठी राज्यभर मोठी मोहीम राबवण्यात येणार असून १ कोटी महिलांच्या सह्या गोळा केल्या जातील. महिलांना संघटित करून आंदोलन उभे करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करत फडणवीस म्हणाले की, "खोटं बोलण्याची स्पर्धा झाली तर सर्व सुवर्णपदक त्यांनाच मिळतील." तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा दाखला देत महिलांच्या प्रतिनिधित्वाबाबत त्यांची भूमिका स्पष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. प्रियांका गांधी यांच्या वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना त्या राजकारणात नवीन असल्याने त्यांना २०२३ च्या दुरुस्तीची पूर्ण माहिती नसावी, असेही ते म्हणाले.

महिला आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा राजकीय वादाच्या केंद्रस्थानी आला असून, आगामी काळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये यावरून संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. २०२९ पर्यंत महिला आरक्षण लागू होईल, असा विश्वास व्यक्त करत फडणवीस यांनी महिलांना एकत्र येण्याचे आवाहन केले.यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे,शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे, मंत्री मेघना बोर्डीकर, मंत्री आदिती तटकरे, भाजपच्या आमदार चित्रा वाघ, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित होते..

# कलिंगड खाण्यापूर्वी ही छोटी चूक करू नका! या युक्तीने टाळा विषारी फळ

उन्हाळ्यातील दुपार कलिंगडाशिवाय अपूर्ण वाटते. गोड चव, भरपूर पाणी आणि शरीराला मिळणारा थंडावा यामुळे हे फळ उन्हाळ्यात सर्वाधिक पसंत केले जाते. सुमारे ९०% पाण्याचे प्रमाण असलेले कलिंगड शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यास मदत करते. याशिवाय त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि लायकोपीनसारखे अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचा, दृष्टी आणि रोगप्रतिकारशक्तीसाठी फायदेशीर ठरतात.

मात्र, कलिंगडाची वाढती मागणी लक्षात घेता काही ठिकाणी कृत्रिम रंग किंवा रसायनांची भेसळ केल्याच्या घटना समोर येतात. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (FSSAI) नुसार, काही विक्रेते कलिंगड अधिक लाल आणि ताजे दिसावे म्हणून एरिथ्रोसिन (Erythrosine) (Red No.३ – E१२७) या कृत्रिम रंगाचा वापर करतात, जो आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो.

**तुमचे कलिंगड सुरक्षित आहे का? अशी करा सोपी चाचणी**

**कापूस चाचणी (Cotton Test):**

१. कलिंगड दोन भागांमध्ये कापा.

२. कापसाचा एक छोटा बोळा घ्या.

३. तो कलिंगडाच्या लाल गरावर हलक्या हाताने चोळा.

**परिणाम कसा ओळखाल?**

जर कापसाचा रंग बदलला नाही, तर कलिंगड नैसर्गिक असण्याची शक्यता जास्त.

जर कापूस लाल झाला, तर कृत्रिम रंग वापरल्याची शक्यता असू शकते.

**पाण्याची चाचणी: रंग मिसळले आहे का ते ओळखा**

१. कलिंगडाचा थोडा लाल गर काढा.



२. तो एका ग्लास पाण्यात टाका.

**परिणाम:**

पाणी लगेच लाल झाले, तर रंग मिसळलेला असण्याची शक्यता.

नैसर्गिक कलिंगड साधारणपणे पाण्यात रंग सोडत नाही.

**बियांचे निरीक्षण करा**

नैसर्गिक कलिंगडाच्या बिया साधारणपणे काळ्या किंवा तपकिरी असतात. जर बिया लाल किंवा गुलाबी दिसत असतील, तर ते कृत्रिम रंगामुळे असू शकते. हा भेसळ ओळखण्याचा सोपा आणि स्पष्ट मार्ग मानला जातो.

**एरिथ्रोसिन म्हणजे काय? आणि त्याचे दुष्परिणाम**

एरिथ्रोसिन (Red No.३ – E१२७) हा एक कृत्रिम लाल खाद्यरंग आहे, जो काही पदार्थांना आकर्षक रंग देण्यासाठी वापरला जातो.

**संभाव्य दुष्परिणाम:**

■ थायरॉईड ग्रंथीवर परिणाम होण्याची शक्यता

■ हार्मोन्सच्या कार्यात अडथळा

■ काही मुलांमध्ये अतिचंचलता आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचणी

■ त्वचेवर पुरळ, खाज किंवा ॲलर्जी प्रतिक्रिया

**महत्त्वाची सूचना**

भेसळ टाळण्यासाठी नेहमी विश्वासार्ह विक्रेत्याकडूनच कलिंगड खरेदी करा आणि वरील सोप्या चाचण्या करून खात्री करा.

अशा साध्या सवयींमुळे उन्हाळ्यातील तुमचा आहार अधिक सुरक्षित ठेवता येऊ शकतो.

# अभ्यासक्रमाविना परीक्षा: उपवर्गीकरणाच्या नावाखाली लोकशाहीची कसोटी



महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा सध्या राज्याच्या सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला. त्यानंतर दि. १० एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णयाद्वारे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली या शासन निर्णयाद्वारे अहवालावर जनतेकडून आक्षेप, मते आणि निवेदने मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. इच्छुकांना ई-मेलद्वारे नोंदणी करून आपले अभिप्राय सादर करण्याची मुदत सुरुवातीला १५ एप्रिल २०२६ पर्यंत देण्यात आली होती, जी नंतर आणि दि. १३ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रेस नोटद्वारे वाढवून ३० एप्रिल २०२६ करण्यात आली. या सर्व प्रक्रियेचा वरकरणी हेतू लोकशाही पद्धतीने जनमत जाणून घेणे असा दिसत असला, तरी प्रत्यक्षात या प्रक्रियेतील अनेक विसंगती आणि विरोधाभास समोर येतात.

सर्वात मूलभूत आणि गंभीर प्रश्न असा आहे की, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविली जात आहेत, तो अहवालच जर सार्वजनिक केला गेला नसेल, तर सामान्य नागरिकांनी नक्की काय वाचून, काय समजून आणि कोणत्या आधारावर आपले मत व्यक्त करायचे? ही परिस्थिती अक्षरशः “अभ्यासक्रमाशिवाय परीक्षा देण्यासारखी” आहे. ज्यांना ‘अ ब क ड’ काय आहे हेच माहीत नाही, त्यांनी त्या परीक्षेत उत्तरे लिहायची कशी? हा प्रश्न केवळ उपरोधिक नाही, तर तो लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उभा करणारा आहे. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही धोरणात्मक निर्णयासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो, परंतु तो सहभाग अर्थपूर्ण आणि माहितीपूर्ण असला पाहिजे. माहितीच उपलब्ध नसेल, तर सहभाग केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. या संदर्भात पाहिले तर, अहवाल सार्वजनिक न करता मते मागविण्याची प्रक्रिया ही केवळ ‘लोकशाहीचा आव आणणारी’ ठरते, प्रत्यक्षात ती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारी आहे.

विशेषतः, महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमधील मोठा वर्ग हा अजूनही सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आणि माहितीच्या अभावामुळे वंचित आहे. अशा परिस्थितीत ई-मेलद्वारे मते मागविण्याची अट ही स्वतःमध्येच भेदभाव करणारी ठरते. ग्रामीण भागातील, डिजिटल साधनसंपत्ती नसलेल्या किंवा संगणक साक्षरता नसलेल्या व्यक्तींना या प्रक्रियेत सहभागी होणे जवळजवळ अशक्यच आहे. म्हणजेच, ज्या घटकांवर या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम होणार आहे, त्यांनाच या प्रक्रियेपासून दूर ठेवले जात आहे. यातून एक मोठा विरोधाभास समोर येतो की सामाजिक न्यायाच्या नावाखाली राबविण्यात येणारी प्रक्रिया प्रत्यक्षात सामाजिक अन्याय वाढविणारी ठरत आहे. उपवर्गीकरणाचा उद्देश जर अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करणे हा असेल, तर त्या विषमतेची अचूक ओळख आणि त्यावर आधारित उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु अहवालाची माहितीच उपलब्ध नसताना, या विषमतेचे स्वरूप काय आहे, त्याची कारणे काय आहेत आणि प्रस्तावित उपाययोजना कोणत्या आहेत, हेच समजत नसल्याने, संपूर्ण प्रक्रिया अस्पष्ट आणि संशयास्पद वाटू लागते.

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही तीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. या समितीमध्ये समाजशास्त्रज्ञ, तज्ज्ञ किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी नसल्याने, या प्रक्रियेतील ‘प्रतिनिधित्वाचा अभाव’ प्रकर्षाने जाणवतो. जे लोक या निर्णयामुळे थेट प्रभावित होणार आहेत, त्यांचा आवाज या समितीत प्रतिबिंबित होत नाही, ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविण्यासाठी पाच-सहा दिवस आणि सुनावणीसाठी सुरुवातीला केवळ दोन दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, ही बाबही लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने अपुरी आणि असमाधानकारक आहे. जरी नंतर मुदत वाढविण्यात आली असली, तरी सुरुवातीचा निर्णय हा घाईघाईत आणि अपुऱ्या तयारीत घेतल्याचे स्पष्ट होते. इतक्या महत्त्वाच्या विषयावर व्यापक चर्चा, जनजागृती आणि संवाद आवश्यक असतो, जो येथे दिसून येत नाही.

अहवाल सार्वजनिक न करण्यामागील कारणे काय असू शकतात, हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. जर अहवालात मांडलेली माहिती, आकडेवारी आणि शिफारसी या वैज्ञानिक आणि तर्कसंगत असतील, तर त्या सार्वजनिक करण्यास काय हरकत आहे? उलट, पारदर्शकतेमुळे जनतेचा विश्वास वाढतो आणि निर्णय प्रक्रियेची वैधता अधिक दृढ होते. परंतु अहवाल गुप्त ठेवून मते मागविणे ही पद्धत संशय निर्माण करणारी ठरते. या संपूर्ण प्रक्रियेकडे पाहिले असता, असे वाटते की, उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ सामाजिक न्यायाचा नसून, तो राजकीय आणि प्रशासकीय अजेंड्याचाही भाग असू शकतो. अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत विभागणी निर्माण करणे, त्यांच्यात स्पर्धा वाढविणे आणि त्यातून राजकीय लाभ मिळविणे, हा एक संभाव्य हेतू असू शकतो, अशी शंका निर्माण होते. अशा परिस्थितीत, समाजातील एकात्मता आणि बंधुता धोक्यात येऊ शकते. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून काही जातींना अधिक लाभ देण्याचा प्रयत्न केला गेला, तर इतर जातींमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. यामुळे सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. सामाजिक न्यायाच्या नावाखाली जर नव्या प्रकारची विषमता निर्माण होत असेल, तर त्या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. याशिवाय, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, प्रतिनिधित्वाचा अभाव, आणि सर्वसमावेशकतेचा अभाव हे तीन मोठे दोष स्पष्टपणे दिसून येतात. हे दोष दूर केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे म्हणजे समाजावर प्रयोग करण्यासारखे आहे. आणि समाजावर केलेले असे प्रयोग दीर्घकालीन दृष्टीने हानिकारक ठरू शकतात. म्हणूनच, शासनाने या संपूर्ण प्रक्रियेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक चर्चा घडवून आणणे, विविध स्तरांवरील प्रतिनिधींना सहभागी करून घेणे आणि त्यानंतरच कोणताही निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, हा निर्णय सामाजिक न्यायाच्या नावाखाली सामाजिक विषमता वाढविणारा ठरू शकतो.

या प्रश्नाकडे अधिक सखोलपणे घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि व्यापक सामाजिक परिणाम या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही आरक्षण धोरण हे केवळ प्रशासकीय निर्णय नसून ते भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत मूल्यांशी आणि न्यायव्यवस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी जोडलेले असते. भारतीय राज्यघटनेने समानतेचे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानले आहे. अनुच्छेद १४ सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता देतो, तर अनुच्छेद १५(४) आणि १६(४) या विशेष तरतुदींमधून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना विशेष उपाययोजना म्हणजेच आरक्षण देण्याची मुभा राज्याला दिली आहे. या तरतुदींचा उद्देश केवळ समानतेचा औपचारिक अधिकार देणे नसून, ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या घटकांना प्रत्यक्षात संधींची समानता मिळवून देणे हा आहे. म्हणूनच आरक्षण ही संकल्पना ‘समानतेतील असमानता’ स्वीकारून ‘खऱ्या समानतेकडे’ नेणारी उपाययोजना मानली जाते. याच पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरतो. एकीकडे, राज्यघटना राज्याला मागासलेल्या घटकांसाठी विशेष उपाययोजना करण्याची मुभा देते; परंतु दुसरीकडे, त्या उपाययोजनांमुळे त्या गटामध्येच नव्या प्रकारची विषमता निर्माण होऊ नये, ही देखील एक महत्त्वाची अट आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातींमध्येच ‘अधिक मागास’ आणि ‘कमी मागास’ अशा प्रकारची विभागणी केली जाते, ज्यामुळे मूलभूत एकात्मतेला तडा जाऊ शकतो.

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्त्वाचे निर्णय लक्षात घेणे आवश्यक आहे. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने उपवर्गीकरणाला तत्त्वतः मान्यता दिली आहे, परंतु त्यासाठी अत्यंत कठोर अटी घातल्या आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, उपवर्गीकरण केवळ तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यांवर आधारित असले पाहिजे. केवळ राजकीय किंवा प्रशासकीय सोयीसाठी असे विभाजन करता येणार नाही. याशिवाय, अशा उपवर्गीकरणामुळे कोणत्याही गटावर अन्याय होणार नाही, याची खात्री करणेही आवश्यक आहे. मात्र, येथेच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की महाराष्ट्रातील या प्रक्रियेत अशा प्रकारचा वैज्ञानिक आणि पारदर्शक आधार कितपत उपलब्ध आहे? न्यायमूर्ती बदर समितीने सादर केलेला अहवाल सार्वजनिकच करण्यात आलेला नसल्याने, त्यातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी यांचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करणे अशक्य झाले आहे. न्यायालयाने अपेक्षित केलेली ‘वस्तुनिष्ठता’ आणि ‘पारदर्शकता’ या दोन्ही बाबी येथे प्रश्नचिन्हाखाली येतात. घटनात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता, ही प्रक्रिया ‘नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वां’शीही विसंगत ठरू शकते. नैसर्गिक न्यायाचा एक मूलभूत सिद्धांत असा आहे की, कोणत्याही निर्णयाचा परिणाम ज्यांच्यावर होणार आहे, त्यांना त्या निर्णयाच्या आधारभूत माहितीची पूर्ण जाणीव असली पाहिजे आणि त्यांना आपले मत मांडण्याची संधी दिली पाहिजे. परंतु येथे परिस्थिती उलट आहे. माहिती न देता मत मागविणे. त्यामुळे ही प्रक्रिया ‘ऐकले जाण्याचा हक्क’ (Right to be heard) या तत्त्वालाच बाधा आणणारी ठरते.

याशिवाय, या प्रक्रियेत ‘समतोल प्रतिनिधित्वा’चा अभावही स्पष्ट दिसून येतो. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही प्रामुख्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, मानवाधिकार कार्यकर्ते किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी यांचा या समितीत समावेश नसल्याने, निर्णय प्रक्रियेत विविध दृष्टिकोनांचा अभाव जाणवतो. लोकशाहीत विविधतेचा सन्मान करणे अत्यावश्यक असते; परंतु येथे एकसुरी प्रशासकीय दृष्टिकोन प्राधान्याने दिसतो. सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले असता, उपवर्गीकरणाचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात. अनुसूचित जाती हा गट आधीच सामाजिकदृष्ट्या वंचित आणि उपेक्षित आहे. या गटामध्येच आणखी विभागणी केल्यास अंतर्गत तणाव वाढण्याची शक्यता आहे. काही जातींना अधिक लाभ मिळाल्याची भावना निर्माण झाल्यास, इतर जातींमध्ये असंतोष आणि उपेक्षा वाढू शकते. यामुळे सामाजिक एकात्मतेला धक्का बसू शकतो. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, उपवर्गीकरणामुळे ‘वंचितांमध्ये स्पर्धा’ वाढण्याचा धोका आहे. जे घटक आधीच मर्यादित संसाधनांसाठी झगडत आहेत, त्यांच्यातच स्पर्धा निर्माण झाल्यास, व्यापक सामाजिक न्यायाचा उद्देशच मागे पडतो. अशा परिस्थितीत, राज्याची भूमिका ‘समावेशक विकास’ घडवून आणण्याची असताना, ती नकळत ‘विभाजन’ घडवून आणणारी ठरू शकते.डिजिटल माध्यमांवर आधारित मते मागविण्याची प्रक्रिया या समस्येला आणखी तीव्र करते. शहरी, सुशिक्षित आणि संसाधनसंपन्न घटकांना या प्रक्रियेत सहभागी होणे सोपे जाते; परंतु ग्रामीण, अशिक्षित आणि उपेक्षित घटक या प्रक्रियेपासून दूर राहतात. यामुळे धोरण तयार करताना एका विशिष्ट वर्गाचे मत अधिक प्रमाणात प्रतिबिंबित होण्याची शक्यता असते. ही बाब ‘समावेशक लोकशाही’च्या तत्त्वांशी विसंगत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पाहिले असता, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत अनेक पातळ्यांवर गंभीर प्रश्न निर्माण होतात. घटनात्मक वैधता, न्यायालयीन निकष, नैसर्गिक न्याय, प्रतिनिधित्व आणि सामाजिक परिणाम. या सर्व बाबींचा सखोल विचार केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे धोकादायक ठरू शकते.

म्हणूनच, शासनाने या प्रक्रियेचा पुनर्विचार करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, संबंधित अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक आणि माहितीपूर्ण चर्चा घडवून आणणे, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि प्रतिनिधींना सहभागी करून घेणे, आणि त्यानंतरच कोणताही अंतिम निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, उपवर्गीकरणाच्या नावाखाली घेतलेले निर्णय हे सामाजिक न्यायाला बळकटी देण्याऐवजी नव्या प्रकारच्या विषमतेला जन्म देऊ शकतात. या संदर्भात एक गोष्ट स्पष्ट आहे की लोकशाही ही केवळ निर्णय घेण्याची प्रक्रिया नाही, तर ती विश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. आणि हा विश्वास केवळ पारदर्शकता, समावेशकता आणि न्याय्यतेच्या आधारावरच निर्माण होतो. जर या तत्त्वांकडे दुर्लक्ष झाले, तर “अभ्यासक्रमाविना परीक्षा” ही केवळ उपमा न राहता लोकशाहीच्या अपयशाचे प्रतीक ठरू शकते.

या प्रश्नाचे आर्थिक, राजकीय आणि धोरणात्मक परिणाम अधिक स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही आरक्षण धोरण हे केवळ सामाजिक समतोलासाठी नसून, ते आर्थिक संधींच्या पुनर्वाटपाशी आणि राजकीय सत्तासंतुलनाशीही निगडित असते. त्यामुळे या प्रक्रियेचे दूरगामी परिणाम काय असू शकतात, याचा सखोल विचार करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम आर्थिक परिणामांकडे पाहिले, तर अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणाच्या संधी शिक्षण, नोकऱ्या, शिष्यवृत्ती, विविध कल्याणकारी योजना या आधीच मर्यादित आहेत. या मर्यादित संसाधनांमध्ये उपवर्गीकरण केल्यास त्याचे विभाजन आणखी सूक्ष्म पातळीवर होईल. परिणामी, काही जातींना अधिक लाभ मिळू शकतो, परंतु इतर जातींच्या संधी कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे ‘संधींची समानता’ साधण्याऐवजी ‘संधींचे पुनर्वाटप’ अधिक असमतोल स्वरूपात होण्याचा धोका निर्माण होतो. विशेषतः, ज्या जाती आधीच काही प्रमाणात पुढे आलेल्या आहेत, त्यांना अधिक लाभ मिळाल्यास खऱ्या अर्थाने वंचित घटक पुन्हा मागे पडू शकतात. याशिवाय, उपवर्गीकरणामुळे शैक्षणिक आणि रोजगाराच्या क्षेत्रात स्पर्धेचे स्वरूप बदलू शकते. एकाच गटामध्ये वेगवेगळ्या उपगटांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्यास, एकूणच सामाजिक उन्नतीचा वेग कमी होण्याची शक्यता आहे. कारण संसाधनांसाठी होणारी ही अंतर्गत स्पर्धा एकात्मिक प्रगतीऐवजी विखुरलेली प्रगती घडवून आणते. दीर्घकालीन दृष्टीने पाहिले असता, हे आर्थिक सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला बाधा आणणारे ठरू शकते. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले असता, उपवर्गीकरणाचा प्रश्न अधिक संवेदनशील ठरतो. अनुसूचित जाती हा गट राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. या गटामध्ये उपविभागणी केल्यास, विविध जातींमध्ये वेगवेगळे राजकीय हितसंबंध निर्माण होऊ शकतात. यामुळे राजकीय पक्षांना विशिष्ट उपगटांना लक्ष्य करून धोरणे आखण्याची संधी मिळते. ही प्रक्रिया दीर्घकालीन दृष्टीने ‘विभाजित राजकारणा’ला चालना देऊ शकते. सामाजिक एकात्मतेच्या ऐवजी ‘ओळख-आधारित राजकारण’ अधिक बळकट होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. याच संदर्भात, उपवर्गीकरणामुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. जेव्हा एका गटामध्येच ‘अधिक पात्र’ आणि ‘कमी पात्र’ अशा प्रकारची विभागणी केली जाते, तेव्हा परस्परांमध्ये अविश्वास निर्माण होतो. सामाजिक न्यायाच्या नावाखाली जर अंतर्गत संघर्ष वाढत असेल, तर त्या प्रक्रियेचा पुनर्विचार करणे अत्यावश्यक ठरते. कारण सामाजिक न्यायाचा खरा उद्देश हा समाजात बंधुता आणि एकात्मता वाढविणे हा आहे, विभागणी करणे नव्हे. या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे ही अत्यंत मूलभूत गरज आहे. अहवालातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी जनतेसमोर मांडल्याशिवाय कोणतीही चर्चा अर्थपूर्ण ठरू शकत नाही. पारदर्शकता ही विश्वासाची पायाभूत अट आहे, आणि ती पूर्ण केल्याशिवाय लोकशाही प्रक्रियेची वैधता निर्माण होऊ शकत नाही. दुसरे म्हणजे, मते आणि आक्षेप नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक करणे आवश्यक आहे. केवळ ई-मेलपुरती मर्यादित न ठेवता, जिल्हास्तरावर सार्वजनिक सुनावण्या, ग्रामसभांमधून चर्चा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अभिप्राय गोळा करणे, अशा विविध माध्यमांचा वापर करणे गरजेचे आहे. यामुळे ग्रामीण आणि उपेक्षित घटकांनाही आपले मत मांडण्याची संधी मिळेल. तिसरे म्हणजे, समितीच्या संरचनेत विविधता आणणे आवश्यक आहे. समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, अनुसूचित जातींचे प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी आणि नागरी समाजातील तज्ज्ञ यांचा समावेश केल्यास निर्णय प्रक्रिया अधिक समतोल आणि वास्तवाधारित होऊ शकते. केवळ प्रशासकीय दृष्टिकोनावर आधारित निर्णय घेणे हे अपुरे ठरते. चौथे म्हणजे, उपवर्गीकरणाचा निर्णय घेताना ‘डेटा-आधारित धोरण’ (evidence-based policy) स्वीकारणे अत्यावश्यक आहे. कोणत्या जाती खरोखरच अधिक मागास आहेत, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती काय आहे, त्यांना मिळालेल्या संधींचे वितरण कसे आहे. या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. अन्यथा, उपवर्गीकरण हे केवळ अनुमानांवर आधारित ठरेल, जे दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. पाचवे म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेत जनजागृतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीतील नागरिकांना त्यांच्या हक्कांबद्दल, प्रस्तावित बदलांबद्दल आणि त्याच्या परिणामांबद्दल माहिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. माहितीशिवाय सहभाग हा केवळ औपचारिक राहतो, आणि औपचारिक सहभागातून न्याय्य निर्णय घडत नाहीत.

या सर्व उपाययोजनांचा विचार केला, तर एक गोष्ट स्पष्ट होते की उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ ‘आरक्षणाचे तांत्रिक पुनर्वाटप’ नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वांची कसोटी आहे. जर ही प्रक्रिया पारदर्शक, समावेशक आणि न्याय्य पद्धतीने राबवली गेली, तर ती खऱ्या अर्थाने वंचित घटकांना न्याय देऊ शकते. परंतु जर ती घाईघाईत, अपारदर्शक आणि मर्यादित सहभागावर आधारित असेल, तर ती नव्या विषमतेला जन्म देऊ शकते. शेवटी, “अभ्यासक्रमाविना परीक्षा” ही उपमा केवळ भाषिक अलंकार नसून, ती या संपूर्ण प्रक्रियेचे वास्तव प्रतिबिंब आहे. जेव्हा नागरिकांना माहिती न देता त्यांच्याकडून मते मागविली जातात, तेव्हा ती लोकशाही प्रक्रिया न राहता केवळ औपचारिकता ठरते.

आणि जेव्हा लोकशाही औपचारिकतेपुरती मर्यादित राहते, तेव्हा तिच्या समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूळ तत्त्वांना धक्का बसतो. म्हणूनच, आज गरज आहे ती केवळ निर्णय घेण्याची नाही, तर योग्य पद्धतीने निर्णय घेण्याची. पारदर्शकता, समावेशकता आणि न्याय्यतेच्या आधारावरच कोणतेही धोरण समाजासाठी हितकारक ठरू शकते.

अन्यथा, सामाजिक न्यायाच्या नावाखालीच सामाजिक विषमता वाढण्याचा धोका निर्माण होतो.

आणि हीच बाब या संपूर्ण प्रक्रियेबाबत सर्वात मोठी चिंता निर्माण करणारी ठरते.

**ॲड. सुनिल बगाटे, (विधिज्ञ, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर)**